सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ०७ एप्रिल २०२५ | वर्ष तिसरे | अंक ०६ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पंतप्रधान मोदींनी केले भारतातल्या पहिल्या लिफ्ट स्वरुपाच्या सागरी रेल्वे पुलाचे उद्घाटन

रामेश्वरम : पंतप्रधान मोदी श्रीलंका दौऱ्यावरुन भारतात थेट तामीळनाडूत आले आहेत. मोदींच्या हस्ते रामेश्वरम येथे भारतातल्या पहिल्या लिफ्ट स्वरुपाच्या सागरी रेल्वे पुलाचे उद्घाटन झाले. पंबन रेल्वे पूल असे या पुलाचे नाव आहे. रामेश्वरम जवळ पंबन येथे इंग्रजांच्या काळातील एक रेल्वे पूल होता. हा पूल जुना झाल्यामुळे नवा रेल्वेचा पूल बांधण्यात आला आहे. नवा पूल हा जुन्या पुलाच्या तुलनेत आधुनिक आणि अभियांत्रिकीतला एक चमत्कार आहे. या पुलाच्या निमित्ताने भारतात पहिल्यांदाच उभ्या लिफ्ट स्वरुपाच्या सागरी रेल्वे पुलाचे उद्घाटन झाले.

नवा पंबन रेल्वे पूल म्हणजे उभ्या सरळ रेषेत वर खाली होऊ शकेल असा पूल आहे. समुद्रात मोठ्या आकाराची बोट जात असेल त्यावेळी पूल लिफ्ट केला जाईल अर्थात आणखी उंचावर नेला जाईल. यामुळे पूल सुरक्षित राहील आणि विना अडथळा पुलाखालून मोठ्या आकाराचे जहाज पुढे निघून जाईल. नंतर पूल पुन्हा खाली आणून पूर्वस्थितीत ठेवला जाईल. या पुलामुळे तामीळनाडूच्या समुद्र किनारी असलेल्या गावांना रेल्वेद्वारे देशातील प्रमुख शहरांशी जोडणे शक्य होणार आहे.

रेल्वेचा नवा पंबन रेल्वे पूल स्टेनलेस स्टील अर्थात पोलादाचा आहे. हा पूल पुढील किमान १०० वर्षे गंजणार नाही. अतिशय मजबूत आणि मोठ्या सागरी वादळातही टिकून राहील असा हा पूल आहे. हा नवीन २.०८ किलोमीटर लांबीचा पंबन पूल रामेश्वरमला मुख्य भूमीशी जोडतो.

रामाच्या जन्माचा उत्सव रामनवमीच्या दिवशी साजरा करतात. दक्षिण भारतातही हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. रामेश्वरममार्गे प्रभू रामाने लंकेत जाण्यासाठी वानरांच्या मदतीने सागरी सेतू उभारला, असा उल्लेख रामायणात आढळतो. या सर्व संदर्भांमुळे रामेश्वरम जवळच्या पंबन रेल्वे पुलाला वेगळे वलय प्राप्त झाले आहे. या पुलाचे उद्घाटन रामनवमीच्या दिवशी पंतप्रधान मोदींनी केले.

पुलाच्या निमित्ताने विकासाचा मुद्दा पुढे करुन पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी तामीळनाडूत विधानसभा निवडणूक डोळ्यांपुढे ठेवून प्रचाराला सुरुवात करण्याची शक्यता आहे. तामीळनाडू विधानसभा २३४ सदस्यांची आहे. या विधानसभेची निवडणूक २०२६ मध्ये होणार आहे. पण भाजपाने त्यासाठीची तयारी आधीपासूनच सुरू केली आहे. उत्तर भारतात मजबूत पकड असलेल्या भाजपाने दक्षिणेत चांगली कामगिरी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

तामीळनाडूत भारतीय जनता पार्टी अण्णाद्रमुकशी युती करुन निवडणूक लढवण्याची तयारी करत आहे. या तयारीचा भाग म्हणून प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई यांना राजीनामा देण्यास सांगण्यात आले आहे. के. अण्णामलाई हे माजी आयपीएस आहेत. त्यांच्या अनुभवाचा राष्ट्रीय पातळीवर उपयोग करुन घेण्याची तयारी भाजपाने केल्याचे वृत्त आहे. तामीळनाडूत अण्णाद्रमुकशी समन्वय साधू शकेल अशा व्यक्तीला प्रदेशाध्यक्ष करुन भाजपा २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाची कामगिरी सुधारण्याचा प्रयत्न करत आहे.

तामीळनाडूत अण्णाद्रमुक हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पक्ष आहे. मागच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने त्यांच्यासोबत केलेली युती अपयशी ठरली होती. मात्र यावेळी दोन्ही पक्ष चुका सुधारुन नव्याने निवडणूक रिंगणात उतरण्याची तयारी करत आहेत.

## फुटबॉल खेळावा तशी लाथा बुक्क्यांची मारहाण; असले प्रकार खपवून घेणार नाही!

### बारामतीतील त्या घटनेवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा संताप

बारामती : बारामतीमधील एका हॉटेल मॅनेजरला काही जणांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली. या घटनेची व्हिडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली असून, या घटनेची दखल राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी घेतली आहे. संबंधित घटना ही सीसीटीव्हीत कैद झाली आहे. अशा घटना वारंवार घडल्या तर आपण थेट मकोका लावू, असा इशारा अजित पवारा यांनी दिला आहे.

मी काय कायम तुमच्यासोबत नाही. काळाच्या पुढं काही करता येत नाही. पण काम करताना नीट करतो. त्यामुळे पुढची लोकं म्हणतील चांगलं काम केलं. परवा माझ्याकडे क्लिप आली. सीसीटीव्ही मध्ये रेकॉर्ड झालं. त्याच्यामध्ये एकाला मारहाण केली. कुत्र्याला जसं मारत असतील तस मारलं. फुटबॉल कसा खेळाला जातो तसा ते लाथा बुक्क्या मारत चालले होते. मी पोलिसांना सांगितलं, कोणीही असो त्याचा बंदोबस्त केला पाहिजे. मी असलं अजिबात खपवून घेणार नाही, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले. त्याचबरोबर असे काही गुन्हे लागतील की ते सतत अशे गुन्हे करत राहिले तर पुढे मोकका पण लागेल, असा इशारा अजित पवार यांनी दिला. तर मेहरबानी करा कोणीही कायदा हातात घेऊ नका, कोणी काही चुकीच कैलं तर पोलिसांकडून येऊन तक्रार करा असे आवाहन त्यांनी केलं. १४ तारेखेला घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जयंती आहे. संविधानाची ७५ वर्ष पूर्ण झाली आहे, तरी काहीकाही जण स्वतः च्या घरीची मालमत्ता असल्यासारखं एखाद्याला बदडून काढत आहेत. हे होता कामा नये. असे देखील अजित पवार यांनी यावेळी सांगितले.

पालकांनी आपली मुलं काय करतात याकडे लक्ष ठेवावे

तुमची मुलं काय करताहेत कुठं चुका करताहेत हे पाहणं पालकांची नैतिक जबाबदारी आहे. ती जबाबादारी पालकांनी पार पाडवी मग मला मुंबईला फोन येतात. दादा चुकलं एकदा पोटात घ्या. आरं पोट फुटायला लागलं आणि काय म्हणतो पोटात घ्या, अशी मुश्किल टिपण्णी देखील अजित पवार यांनी यावेळी बोलताना केली. सांगणाऱ्याला पण लाज, लज्जा काही शरम काही कशी वाटत नाही. एवढे त्याला बेदम मारलं. यामुळे शिक्षा कठोर झाल्याशिवाय लोकांना त्याची किंमत कळत नाही, असे देखीलल ते म्हणाले.

## पुण्यातील विद्यार्थ्याने तयार केली जगातील सर्वात लहान रुग्णवाहिका




नवी दिल्ली : भारत मंडपम येथे झालेल्या तीन दिवसांच्या स्टार्टअप महाकुंभात भारतासह ५० देशांमधील तीन हजारांपेक्षा जास्त स्टार्टअप कंपन्या सहभागी झाल्या. अनेक प्रतिभावान तरुणांनी त्यांच्या नानाविध कल्पनांचे सादरीकरण केले. पण स्टार्टअप महाकुंभात सर्वांचे लक्ष वेधले ते एका पुण्यातून आलेल्या विद्यार्थ्याने. या विद्यार्थ्याने जगातील सर्वात लहान रुग्णवाहिका तयार केली.

पुण्यातून आलेल्या विद्यार्थ्याने जगातील पहिली आणि सर्वात लहान सौरऊर्जेवर चालणारी रुग्णवाहिका तयार केली. या रुग्णवाहिकेची लांबी २.९ मीटर आहे, जी टाटा नॅनोपेक्षा ०.२ मीटर लहान आहे. अतिशय लहान जागेतही ही रुग्णवाहिका सहज जाऊ - येऊ शकते. यामुळे अपघाताच्या ठिकाणी रुग्णांच्या, जखमींच्या मदतीसाठी ही रुग्णवाहिका घेऊन जाणे सोपे आहे. रुग्णवाहिकेत आवश्यक असलेल्या सर्व वैद्यकीय सोयीसुविधा या रुग्णवाहिकेतही आहेत. पण आकाराने लहान असल्यामुळे या रुग्णवाहिकेचा दैनंदिन खर्च हा इतर रुग्णवाहिकांच्या तुलनेत कमी आहे.

पुण्यातील एका आंतरराष्ट्रीय शाळेत शिकणाऱ्या सुधांशू पालने ही जगातील पहिली आणि सर्वात लहान सौरऊर्जेवर चालणारी रुग्णवाहिका तयार केली आहे. आतापर्यंत तयार वाहनाचे रुपांतर रुग्णवाहिकेत करण्याची पद्धत रुढ होती. पण या प्रयोगाच्या निमित्ताने पहिल्यांदाच रुग्णवाहिका म्हणून नवे वाहनच तयार केले आहे. अवघड वळणावर वा अरुंद जागेत जाऊन ही रुग्णवाहिका प्रभावीरित्या काम करू शकते.

## अयोध्या, काशी, दिल्ली, नागपूरसह देशभरात रामनवमीचा मोठा उत्साह



नवी दिल्ली: देशभरात आज रामनवमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. अयोध्या, काशी, दिल्ली, नागपूर, कोलकातासह देशातील विविध शहरांमध्ये सकाळपासूनच मंदिरांमध्ये भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. उत्तर प्रदेशातील अयोध्येत रामनवमीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भव्य दिव्य सोहळ्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

संपूर्ण रामनगरी पाने-फुले तसेच रंगीबेरंगी दिव्यांनी सजवण्यात आली आहे. श्रीराम जन्मभूमीचे मुख्य द्वार आणि राम मंदिरालाही आकर्षक सजावट करण्यात आली आहे. कोलकातामध्ये पाच मोठ्या यात्रांसह ५० हून अधिक रामनवमीनिमित्त यात्रा काढण्यात येतील अशी शक्यता आहे. यामुळे पोलिसांनी येथे कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. युपीच्या ४२ शहरातही रामनवमी बाबत अलर्ट जारी करण्यात आला आहे.

या जिल्ह्यामध्ये अतिरिक्त पोलीस कुमक तैनात करण्यात आली आहे. रामनवमीच्या निमित्ताने पश्चिम बंगाल हे संवेदनशील राज्य आहे. येथे गेल्या काही वर्षांमध्ये विविध शहरांमध्ये रामनवमीच्या निमित्त धार्मिक तणाव पाहायला मिळाला होता. यामुळे येथील सुरक्षा व्यवस्थेबाबत पोलीस अलर्ट आहेत.

शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी मुंबईत १३,५००हून अधिक पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. हिंदू कॅलेंडरनुसार चैत्र महिन्यातील नववा दिवस हा राम नवमी म्हणून साजरा केला जातो. हिंदू ग्रंथ आणि पुराणानुसार या दिवशी श्रीरामांचा जन्म झाला होता. म्हणून याला रामनवमी म्हटले जाते.

पंतप्रधान मोदींनी दिल्या शुभेच्छा

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही रामनवमीच्या देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. सर्व देशवासियांना रामनवमीच्या खूप शुभेच्छा. प्रभू श्रीरामांचा हा जन्मोत्वस तुमच्या जीवनात नवी चेतना आणि नवा उत्साह घेऊन येवो. तसेच सशक्त, समृद्ध आणि समर्थ भारताच्या संकल्पनेला नवी ऊर्जा प्रदान करो. जय श्रीरामअसे पंतप्रधान मोदींनी आपल्या सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

## निरोप समारंभाचे भाषण करतेवेळी महाविद्यालयात विद्यार्थिनीचा मृत्यू





धाराशिव : परांडा तालुक्यातील शिंदे महाविद्यालयात निरोप समारंभ सुरू होता. या समारंभात बोलतेवेळी २० वर्षांच्या वर्षा खरात हिला हृदयविकाराचा तीव्र झटका आला. बोलता बोलता वर्षा स्टेजवर कोसळली. डॉक्टरांनी तपासून वर्षाचा मृत्यू झाल्याचे सांगितले. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

वर्षा निरोप समारंभात भाषण करत होती. ती भाषणाला उभी राहिली तेव्हा तिला कसला त्रास होत आहे, असे कोणालाही वाटले नव्हते. यामुळे बोलता बोलता ती कोसळली तेव्हा उपस्थित असलेले सर्वजण चक्रावले. डॉक्टरांनी वर्षाचा मृत्यू झाल्याचे सांगितल्यावर उपस्थितांना धक्का बसला.

निरोप समारंभाच्या भाषणात वर्षाने शिक्षकांचे आभार मानले. ती महाविद्यालयातील मैत्रिणी आणि शिक्षक यांच्यासंदर्भात बोलत होती. बोलत असताना ती कोसळली.

वर्षा स्टेजवर पडताच उपस्थितांपैकी काही जण स्टेजच्या दिशेने धावले. त्यांनी वर्षाला उठवण्याचा प्रयत्न केला. अनेकांना वाटले की चक्कर आल्यामुळे वर्षा स्टेजवर कोसळली आहे. प्रत्यक्षात भलतेच घडले होते. वर्षाची श्वसन प्रक्रिया थांबल्याची जाणीव होताच तातडीने डॉक्टरांना बोलावण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी केली आणि वर्षाचा मृत्यू झाल्याचे सांगितले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आठव्या वर्षी वर्षाच्या हृदयावर शस्त्रक्रिया झाली होती. ही शस्त्रक्रिया झाल्यानंतर अखेरचा श्वास घेण्याआधीपर्यंत वर्षाने कधीही छातीत वेदना होत असल्याची तक्रार केली नव्हती. सध्या वर्षा कोणतेही औषध घेत नव्हती. यामुळे अचानक हृदयवाराचा तीव्र झटका कसा आला हा प्रश्न अनेकांना पडला आहे.

## महाराष्ट्राला विकासाच्या शिखरावर नेणे हाच पक्षाचा संकल्प - मुख्यमंत्री

मुंबई, ६ एप्रिल : भारतीय जनता पार्टीची वाटचाल तेजस्वी आहे, आपल्या सरकारच्या कारकिर्दीत सुरू असलेला विकासाचा आलेख उंचावता आहे, पण एवढ्यावरच न थांबता आणखी खूप काही आपल्याला करायचे आहे. सामान्य माणसाच्या जीवनात बदल घडवून आणून परिवर्तनाचा पाया रचणारे एक गतिशील, पारदर्शी, प्रामाणिक सरकार देण्यासाठी आपले सरकार सातत्याने प्रयत्नशील असून शंभर दिवसांच्या कारभारातून आपण हा संदेश देऊ शकलो आहोत. महाराष्ट्राला सर्वोच्च स्थानी नेल्याखेरीज हे सरकार थांबणार नाही ही ग्वाही मी देतो, पण या गतिमान वाटचालीत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जनता आणि सरकार यांमधील समन्वयाचा व संवादाचा सेतू होऊन काम केले पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्याला असाच प्रचंड विजय मिळवायचा असून, भारतीय जनता पार्टी ही सामान्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याकरिता महाराष्ट्रात सातत्याने निवडून येत राहील, याकरिता आपला पाया मजबूत करून सामान्य माणसाचा विचारच मनात राहील असा संकल्प करू, आणि या महान पक्षाला अधिक महानता प्राप्त करून देण्याासाठी अधिकाधिक योगदान देण्याचा संकल्प स्थापना दिनानिमित्त सर्वांनी करू या, असा महत्वपूर्ण संदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी महाराष्ट्रातील भाजपा कार्यकर्त्यांना दिला. भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित ऑनलाईन कार्यकर्ता संमेलनात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनसंघ ते भाजपा या वाटचालीतील तेजस्वी टप्प्यांचा अतिशय समर्पक आढावा घेतला. पक्षाचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश, प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, मुंबई भाजपाचे अध्यक्ष आशीष शेलार, राज्य मंत्रिमंडळातील भाजपाचे सर्व मंत्री, पक्षाचे खासदार, आमदार, पदाधिकारी व कार्यकर्ते या संमेलनास उपस्थित होते.

## 'सीबीएसई'च्या धर्तीवर इयत्ता पहिलीचा अभ्यासक्रम



सोलापूर : शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्याची परंपरा यावर्षीही कायम राखली जाणार आहे. त्यासाठीची तयारी बालभारती व शालेय शिक्षण विभागाने केली आहे. ३१ मे पर्यंत शाळा स्तरावर पुस्तक पुरवण्याचे नियोजनही आखले आहे. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम बदलणार असून तो 'सीबीएसई'च्या धर्तीवर तयार करण्यात आला आहे. त्यात चित्रांमधून विद्यार्थ्यांना अधिकाधिक माहिती देण्याचा प्रयत्न आहे. मुलांची आवड लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील पहिली ते आठवीच्या सर्व सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी, अनुदानित अशा जिल्हा परिषदेच्या सर्वच शाळांमधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. जिल्ह्यातील मराठी, उर्दू व कन्नड माध्यमांच्या पाठ्यपुस्तकांचा समावेश आहे. त्यासाठी पुण्याच्या बालभारतीकडून पुस्तके मिळणार आहेत.

तालुका व केंद्र स्तरावर उतरवून घेण्याचे व ती शाळांपर्यंत वेळेत पोचवण्याची तयारी शिक्षण विभागाने केली आहे. दुसरीकडे विद्यार्थ्यांच्या गणवेशाचा निर्णय शाळा व्यवस्थापन समिती स्तरावर होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश देखील मिळणार आहेत.

## लातूर महापालिका आयुक्तांचा आत्महत्येचा प्रयत्न



लातूर : लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी आपल्या शासकीय निवासस्थानी रिव्हॉल्वरमधून स्वतः वर गोळी झाडून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. आत्महत्येचा प्रयत्न करण्याचे कारण अद्याप समजलेले नाही.

गोळी डोक्यातून आरपार गेली असल्यामुळे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांची प्रकृती गंभीर आहे. सध्या आयुक्तांवर लातूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या निर्देशांनुसार वरिष्ठ पोलीस अधिकारी तपास करत आहेत.

लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांचा आत्महत्येचा प्रयत्न करण्याआधीच्या काही तासांत कोणाकोणाशी संपर्क झाला आणि काय बोलणे झाले हे जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी नेमक्या कोणत्या कारणामुळे निराश होऊन टोकाचे पाऊल उचलले हे जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी यापूर्वी जालना, धाराशिव, नांदेड या नगरपरिषद महानगरपालिकांमध्ये अधिकारी म्हणून काम केले आहे. त्यांनी लातूर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून कार्यरत असताना टोकाचे पाऊल उचलले आहे.

## प्रभूरामचंद्राची आदर्श पुत्र, भाऊ, पती, पिता, शिष्य आणि आदर्श राजा ही प्रतिमा प्रत्येक भारतीयांच्या मनात ठसलेली आहे-राजीव जहागिरदार



छत्रपती संभाजीनगर - आई वडीलांच्या आज्ञेचा स्विकार करुन आयोध्येचे राज्य मिळणार नाही ही बाब लक्षात घेऊन भर तारुण्यात प्रभू रामचंद्र सीतामाई व बंधू लक्ष्मणासह १४ वर्ष वनवासाला गेले.यातून त्यांची मातृ-पितृ भक्ती लक्षात येते.याशिवाय प्रभूरामचंद्रांमध्ये प्रामुख्याने धैर्यवान,साहसी,न्याय िराजा,उदार,चारित्र्यवान, कृतज्ञ सत्यवादी,सहनशील,कुशल योद्धा व दृढ प्रतिज्ञा हे पण गुण पाहायला मिळतात अशी माहिती विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार यांनी दिली ते राम बहुउद्देशीय शिक्षण संस्थेतर्फे आयोजित श्रीराम जन्मोत्सव कार्यक्रमात बोलत होते या यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष मिलिंद खोडे, जगदीश लोणीकर बाबुराव नालमवार प्रेम खडकीकर आणि जयस्वाल उपस्थित होते.

यावेळी बोलताना जहागिरदार पुढे म्हणाले प्रभू श्री रामचंद्र यांचा एक आदर्श पुत्र आदर्श भाऊ आदर्श पती आदर्श पिता आदर्श शिष्य आदर्श राजा म्हणून केलेल्या आदर्श घेऊन आपण आपले दैनंदिन काम केल्यास भारताची सांस्कृतिक प्रतिमा सर्व जगभर उंचावल्याशिवाय राहणार नाही.

हनुमंताला ज्याप्रमाणे आपल्या पराक्रमाचे विस्मरण झाले होते. जांबुवंताने हनुमंताला त्यांनी केलेल्या पराक्रमाचे स्मरण करून दिल्यानंतर हनुमंताने विराट रूप धारण करून शतयोजने पसरलेला सागर उल्लंघून लंकेत प्रवेश केला त्याप्रमाणे सद्यस्थितीत हिंदू समाजाला त्यांच्या पूर्वजांनी केलेल्या पराक्रमाची आठवण करून देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

आई-वडिलांचे आज्ञेवरून प्रभू रामचंद्र चौदा वर्ष वनवासात होते पण बाबराचा सेनापती मीर बाकी यांनी अयोध्येतील मंदिरावर हल्ला करून तेथे बाबरी मज्जिद बांधली तेव्हापासून २१ जानेवारी २०२४ पर्यंत म्हणजेच ४९६ वर्ष प्रभूश्रीराम यांना पुनश्च वनवास पत्करावा लागला. देशातील लाखो हिंदूंनी एकत्र येऊन ६ डिसेंबर १९९२ ला आपला पराक्रम दाखवून दिला. अयोध्येतील बाबरी ढाच्या पूर्णपणे उध्वस्त केला.उच्च न्यायालयाने विविध पुराव्यांच्या आधारे हिंदूंच्या बाजूने निकाल दिला आणि २२ जानेवारी २०२४ ला अयोध्येत बालरूपातील श्रीराम भव्य मंदिरात विराजमान झाले ही आमच्या पिढीसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

यावेळी श्री बाबुरावजी नालमवार प्रेम खडकीकर यांनी आपले विचार व्यक्त केले जगदीश लोणीकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमाला संस्थेच्या सचिव मृणाल खोडे पूर्णानंद शिरसाठ ललित देशमुख अमोल ठाकूर गौतम यादव राहुल नळदुर्गकर संतोष जोशी सह राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि परिवारातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते

सर्वात शेवटी श्री.प्रभुरामाची आरती आणि प्रसाद वाटप होऊन कार्यक्रमाची सांगता झाली

## पुणे - ५३ ग्रा.पं.मध्ये एकाच व्यक्तीची अनेक ठिकाणी नेमणूक

पुणे, ६ एप्रिल - बारामती तालुक्यातील ९९ पैकी ५३ ग्रामपंचायतीत एकाच व्यक्तीची अनेक पदांवर नेमणूक झाली आहे. माहिती अधिकारातून ही बाब उघड झाली आहे. एकच व्यक्ती अनेक ठिकाणी काम करत शासनाकडून पगार, मानधन लाटत आहे. काही ग्रामपंचायतीत एकाच कुटुंबातील तिघे कामावर आहेत. या संपूर्ण प्रकाराची जिल्हा परिषदेने स्वतंत्र समितीद्वारे चौकशी करत संबंधितांकडून आजवर घेतलेल्या पगाराची वसुली करावी, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते पोपट धवडे यांनी केली आहे. ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामरोजगार सेवक, आशा स्वयंसेविाक, संगणक चालक (सीएससी ऑपरेटर), अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस या पदांपैकी एकाच पदावर काम करत शासनाकडून पगार अथवा मानधन घेणे कायद्यानुसार अपेक्षित आहे.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# लोकांना लुटणारे पाच तोतये अटकेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
शहरासह जिल्हाभरात पोलीस असल्याची बतावणी करून लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी आम्ही 'एसआयटी'चे अधिकारी आहोत, पुढे दंगल, लूटमार सुरू आहे, दागिने काढून ठेवा, असे म्हणत हातचलाखीने दागिने काढून घेऊन त्याऐवजी दगड नागरिकांच्या हाती देऊन लूटमार करणाऱ्या बिदर जिल्ह्यातील पाच जणांना पोलीसांनी जेरबंद केले आहे.

जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी महिला, पुरुष तसेच ज्येष्ठ नागरिकांना जवळ करीत, पुढे लूटमार होत असल्याचे सांगत लूटमार करणारी टोळी जिल्ह्यात सक्रिय झाली होती. खोटे-नाटे सांगून संबंधितांकडील सोने काढून रुमालमध्ये बांधून घेण्यास सांगणे व हातचलाखी करून दागिने असलेला रुमाल स्वतःकडे ठेऊन नागरिकांना दुसऱ्याच रुमालमध्ये दगड बांधून दिले जात होते.

अहमदपूर-किनगाव दरम्यानच्या मार्गावर अशाच प्रकारे नागरिकांची लूट होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यानुसार कारवाई करण्यात आली असून जावेद जाफरी, बाली जाफरी, नजीर हुसेन अजीर अली हुसैनी नासीर अली, हस्नी नासीर हुसैन, तक्की युसुफ अली (रा. सर्व बिदर) या पाचजणांना ताब्यात घेतले आहे.

या टोळीतील काहींवर उदगीर ग्रामीण आणि अहमदपूर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद आहे. या घटनेतील आरोपींना ताब्यात घेतल्यानंतर पूर्वीच्या गुन्ह्यातील फिर्यादीला आरोपींची ओळख पटल्यानंतर दोघांना उदगीर पोलीस ठाणे तर तिघांना अहमदपूर पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणारः धुमाळ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
जिल्ह्यातील सर्व शिक्षक भयमुक्त व्हावेत, यासाठी आपण संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केला. शिक्षकांना स्वाभिमानाने आपले कर्तव्य पार पाडता यावे, यासाठी आपण आणखी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष मदन धुमाळ यांनी येथे केले.
शहरातील शिवाजी विद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कार्यक्रमास माध्यमिक शिक्षण विभागाचे अधिक्षक अंकुश शिंगडे, राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हा सचिव दयानंद कांबळे, संचालिका मेघा सोळंके, प्रवीण घोरपडे, शेषराव लातूरे यांची उपस्थिती होती. यावेळी शिवाजी विद्यालयातील १६५ विद्यार्थ्यांना रजिस्टर व शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. याशिवाय, विविध शालेय कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमास संघाचे जिल्हाध्यक्ष (ग्रा.) राम व्यंजने, डॉ. सुवर्णा जाधव, सतीश हलगरकर, शिवहार रोडगे, काजीम कादरी, अशोक तोगरे, उमाकांत मटके आदी उपस्थित होते.

### चक्रवर्ती सम्राट अशोक मौर्य यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने शनिवारी चक्रवर्ती सम्राट अशोक मौर्य यांच्या जयंतीनिमित्त येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे अभिवादन करण्यात आले.

यावेळी भिक्खू पाय्यानंद, भिक्खू बोधिराज व भिक्खू बोधिशील, डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे, सचिव राहुल कांबळे, भारतीय बौद्ध महासभेच्या अध्यक्षा आशाताई चिकटे, समता सैनिक दलाचे राजाराम साबळे, ब्लू पॅन्थरचे साधूभाऊ गायकवाड, डी.एस. नरसिंगे, विलास आल्टे, मिलिंद धावारे, भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, महाविहार धम्मसेवक ग्रुपचे सदस्य, माता भीमाई शाक्य संघ, सेवानिवृत्त पोलिस कर्मचारी व अधिकारी, संघटनेचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

### केदारनाथ प्रतिष्ठानच्या वतीने सोमवारी सामुहिक उपनयन संस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
शहरातील केदारनाथ प्रतिष्ठान व शामराव पाटील चॅरिटेबलच्या वतीने गतवर्षीपासून सामुहिक उपनयन संस्कार सोहळा आयोजित करण्यात येत आहे. यावर्षी हा सोहळा सोमवार दि. ७ एप्रिल रोजी पार पडणार असून या सोहळ्यात अधिकाधिक बटूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. जगन्नाथ पाटील यांनी केले आहे.
हिंदू धर्मात उपनयन संस्कारास मोठे महत्व आहे. मात्र अनेकजण आपल्या विविध कारणांमुळे किंवा आर्थिक परिस्थितीमुळे हा संस्कार करू शकत नाहीत. त्यामुळे या संस्कारापासून कोणीही वंचित राहू नये याकरिता केदारनाथ प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्ष डॉ. जगन्नाथ पाटील यांच्या संकल्पनेतून गतवर्षीपासून हा सोहळा होत आहे.

### राज्याच्या पंचायत राज समितीवर आ. अभिमन्यू पवार यांची वर्णी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
राज्याच्या पंचायत राज समितीत लातूर जिल्ह्यातील एकाच आमदाराची वर्णी लागली. त्यात औशाचे आमदार अभिमन्यू पवार यांचा समावेश आहे. समितीचे प्रमुख म्हणून आमदार संतोष दानवे यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे. समितीत प्रमुखासह वीस सदस्यांचा समावेश आहे.
आमदार पवार यांची पंचायत राज समितीत सदस्य म्हणून निवड झाली. सरकार स्थापनेपासून पंचायत राज समिती निवडीची प्रतीक्षा होती. राज्य सरकारने काल समिती जाहीर केली. राज्याच्या पंचायत राज समितीत सदस्य म्हणून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यास प्रतिनिधीत्व देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. ही समिती पुढील पाच वर्ष पंचायत राज अंतर्गत केल्या गेलेल्या कामास प्रोत्साहन देण्याचे काम करणार आहे.

# हलगरा पाटीजवळ साडेतीन लाखांचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
निलंगा तालुक्यातील हलगरा पाटी येथील मदिना हॉटेल येथे गुटखा, सुगंधित तंबाखू आणि जर्दाची अवैध विक्री होत असताना पोलीस पथकाने टाकलेल्या धाडीत ३ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. दुपारी अडीच्या सुमारास उपविभागीय पोलिस अधिकारी राजश्री तोरणे पाटील यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.



निलंगा तालुक्यासह देवणी परिसरात अवैध गुटखा विक्री होत असल्याची माहीती पोलीस पथकाला मिळाली होती. त्यानुसार पोलीस अधिकारी राजश्री तोरणे यांनी औराद शहाजानी पोलीस ठाण्यातील कर्मचारी बोलावून घेत सलग तीन तास शोधाशोध केली. यामध्ये विमल जर्दा, सुगंधी सुपारी, सुगंधी तंबाखू, असा एकूण ३ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

बळीराम धोंडीबा केंद्रे यांच्या फिर्यादीवरून आरोपी फारुख मदार मुल्ला (वय ३५) रा. हलगरा ता. निलंगा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक विठ्ठल दुरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जनार्धन काळे करीत आहे.

# जिल्ह्यातील ३९०० घरात 'सूर्य'प्रकाश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
जिल्ह्यातील अनेक वीजग्राहक छतावरील सौरऊर्जाकडे वळू लागले असून, ते स्वतःच स्वतःची वीज तयार करत आहेत. प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजना सर्वसामान्य नागरिकांसाठी फलदायी ठरत आहे. सूर्यघर योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील ३ हजार ९०० घरगुती वर्गवारीतील ग्राहक विजेबाबत स्वयंपूर्ण झाले आहेत.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घराच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्प बसवून वीजनिर्मिती केली जाते. त्यासाठी केंद्र सरकारकडून एक किलोवॅट क्षमतेच्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी तीस हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेसाठी साठ हजार रुपये तर तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेसाठी ७८ हजार रुपये थेट अनुदान मिळते. या योजनेतील ग्राहकांना मोफत नेट मीटर देण्यात येते. या योजनेंतर्गत लातूर जिल्ह्यातील ३ हजार ९०० ग्राहकांनी घराच्या छतावर सौरऊर्जे चे संच बसवले आहेत. यात लातूर विभागातील २ हजार ७८८, निलंगा २३२, तर उदगीर विभागातील ८८० वीजग्राहकांचा समावेश आहे. २ हजार ४८५ ग्राहकांच्या छतावर संच बसविण्याचे काम सुरू आहे.

# लातूर इंडस्ट्रियलीस्टच्या शिबिरात ५६ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
येथील एमआयडीसीत लातूर इंडस्ट्रियलीस्ट्स ऑर्गनायझेशन नेशनवाईड संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या शिबिरात ५६ जणांनी रक्तदान केले. तसेच संघटनेच्या नामफलकाचे अनावरण सुधीर धुत्तेकर यांच्या हस्ते करण्यात आले. नव्याने स्थापन झालेल्या संघटनेच्या अध्यक्षपदी राजा राचट्टे तर सचिवपदी कमलाकर जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

जुन्या एमआयडीसीतील लातूर वजन काट्यासमोर कार्यालयाची सुरूवात करण्यात आली असून यानिमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिराज उद्योजकांनी सहभाग नोंदविला.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष राजा राचट्टे, उपाध्यक्ष कृष्णा तिघिले, नितीन कडगंजी, सचिव कमलाकर जाधव, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा संघटनेचे मार्गदर्शक प्रदीप सोलंकी, सहसचिव राकेश जांगीड, कोषाध्यक्ष विलास बच्चेवार, सदस्य जनार्दन नरहरे, रतन कांबळे, निखील गर्जे, भरत जाधव, महेश कोल्हे, रविंद्र आर्य, रवी अग्रवाल, किरण प्रयाग, उदयकुमार कित्तुर यांच्यासह उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी संघटनेचे सचिव कमलाकर जाधव यांनी कार्यक्रमाची भूमिका विषद केली.

# विशेष वसुली मोहिमे अंतर्गत गाळे धारकांवर धडक कार्यवाही

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
लातूर शहर महानगरपालिकेमार्फत मनपा मालकीच्या व्यापारी संकुल व बी ओ टी तत्वावरील व्यापारी संकुल येथे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या आदेशान्वये उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण०६ पथक नियुक्ती करण्यात आलेले आहेत.

सदर पथकाने विशेष वसुली मोहिम राबविण्यात आली आहे. सदर मोहिमेमध्ये आज रोजी चेकव्दारे रक्कम रु ७,३४,४२८/- व नगदी २,६५,४४२/- असे एकूण १०,१८,८७०/- रु आज रोजी वसुली करण्यात आलेली आहे. तसेच सदर विशेष वसुली मोहिममध्ये ३ फ्रुट मार्केट सा.क्रं. ८२ व्यापारी संकुलातील ०९ गाळे थकबाकी रक्कम रु २३,९३,८०३/- साठी सिल करण्यात आले आहेत. तर मनपा मालकीच्या व बी. ओ. टी. तत्वावरील व्यापारी संकुलातील



गाळे धारकांना व्याजामध्ये ५०% सुट या सुवर्णसंधीचा फायदा घेऊन ज्या गाळे धारकांकडे थकबाकी आहे अशा गाळे धारकांनी तात्काळ एकरकमी थकबाकीचा भरणा करुन मनपास सहकार्य करावे, तसेच यापूर्वी सिल करण्यात आलेल्या गाळे धारकांना सूचित करण्यात येते की आपल्याकडील थकबाकी भरणा करुन घेण्यात यावी.

अन्यथा सदर गाळयांचा ई-लिलाव करण्यात येईल. व ज्या गाळे धारकांकडे थकबाकी आहे असे गाळे मनपामार्फत सिल करुन सदर गाळयांचा ई-लिलाव ची होणारी कटू कार्यवाही टाळावी असे आवाहन उपायुक्त, डॉ. पंजाब खानसोळे यांनी केलेली आहे.

# बोगस इंग्रजी माध्यमाच्या शाळांवर कारवाई करा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
जिल्ह्यात अनेक बोगस इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालू आहेत. या शाळांवर तात्काळ कारवाई करावी. अनुकंपा तत्त्वावर शिक्षण सेवक म्हणून लागलेल्या शिक्षकांना विनाविलंब शिक्षक वेतनश्रेणी द्यावी, अशी मागणी कास्ट्राईब शिक्षक संघटनेने जिल्हा परिषदेकडे केली.

कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या मागणीवरून जिल्हा परिषदेतल्या विविध विभागांतील कर्मचारी, शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी शुक्रवारी जि. प.च्या स्थायी समिती सभागृहात बैठक पार पडली. बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, उपमुख्य लेखा अधिकारी नागणे, उपशिक्षणाधिकारी हाश्मी यांच्यासह अन्य विभागांचे खाते प्रमुख उपस्थित होते. यावेळी कास्ट्राईब शिक्षक संघटनेने जि. प.च्या सामान्य प्रशासन विभागांतर्गत येणाऱ्या विविध विभागांतील पात्र कर्मचाऱ्यांचीच बदली करण्यात यावी. टेबल किंवा आस्थापना बदली करताना सर्व कर्मचाऱ्यांना समान न्याय व संधी द्यावी. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी भरती जाहिरात अधिसूचना । निर्गमित झालेल्या शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर रूजू झालेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना शासन निर्णयानुसार जुन्या निवृत्ती योजनेचा लाभ द्यावा. शालेय पाठ्यपुस्तकांचे काटेकोरपणे नियोजन करून पाठ्यपुस्तके मोफत शाळास्तरावर देण्यात यावी. नवोदय परीक्षेचे सर्व विद्यार्थ्यांचे गुण जाहीर करण्याबाबत शासन स्तरावर मागणी करावी अशा मागण्या करण्यात आल्या.

# शहरातील जीर्ण इमारत कोसळली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
शहरातील गंजगोलाई परिसरातील एक जीर्ण इमारत शनिवारी सकाळी कोसळली. सुदैवाने यात जिवीतहानी टळली असून इमारतीचा काही भाग एक ऑटोरिक्षा व दुचाकींवर कोसळल्याने त्यात या वाहनांचा चुराडा झाला. या घटनेमुळे महापालिकेचा भोंगळ कारभार पुन्हा चव्हाट्यावर आला आहे.

महापालिकेत सद्या 'प्रशासक'राज आहे. या शहरातील गाव भागासह विविध ठिकाणी जीर्ण झालेल्या व पडायला आलेल्या शेकडो इमारती आहेत. मात्र, महापालिका प्रशासनाकडून अशा धोकादायक इमारतींचा बंदोबस्त करण्यात येत नाही. शनिवारी



सकाळी अत्यंत गजबजलेल्या व रहदारी असलेल्या गंजगोलाई परिसरातील दक्षिण बाजूच्या घंटे परिवाराच्या मालकीची जुनी जीर्ण इमारत कोसळली आहे.

यात एक ऑटोरिक्षा आणि तीन दुचाकींचा चुराडा होऊन नुकसान झाले आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. त्यामुळे अनेकजण इमारतीच्या सावलीत उभारतात. मात्र, या घटनेच्या वेळी सुदैवाने तिथे कोणी नव्हते. त्यामुळे जिवीतहानी टळली आहे.

ही जीर्ण इमारत धोकादायक असताना महापालिका प्रशासनाने ती पाडली नाही किंवा ही इमारत धोकादायक म्हणून काही उपाययोजनाही केली नाही. या दुर्घटनेत जिवीतहानी झाल्यानंतरच महापालिका प्रशासन जागे होते. दुर्घटनेपूर्वी का उपाययोजना केल्या जात नाहीत, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. शहरात नियम डावलून कोणतीही उपाययोजना न करता आठ-आठ मजले इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या इमारतींचे बांधकाम करताना दुर्दैवाने जिवीतहानी झाली तर याला जबाबदार कोण? असा प्रश्न शहरवासीयांकडून विचारला जात आहे.

# सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.या समारंभसाठी अनुमती देऊन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी सहकार्य केले.

या निरोप समारंभाचे अध्यक्षपद रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर यांनी भूषवले. ते म्हणाले की,महाविद्यालयीन जीवनाचा आनंद घ्यावायचा असेल तर सर्वांनी नियमित कॉलेज करणे गरजेचे आहे,तरच तुम्हाला त्या कोर्सबद्दल गोडी निर्माण होईल आणि त्या क्षेत्रातील उपलब्ध असलेल्या संधीची माहिती होईल,असे ते म्हणाले.याप्रसंगी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या निरोप समारंभ कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीती कलवाले,अक्षता कलवाले,श्रद्धा माने,श्रुती पवार यांनी संयुक्तरित्या केले,तर कार्यक्रमाची प्रस्तावना पदव्युत्तर समन्वयक प्रा.पाटील एस.डी.यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रीती कलवाले यांनी केले.

# कलागुणांना चालना देण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -**
ऑटिझम म्हणजेच स्वमग्नता हा दिव्यांगत्वाचा एक प्रकार सध्या लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येत आहे. लवकर निदान आणि वेळीच उपचार करून या दिव्यांगत्वाची तीव्रता कमी करता येते. स्वमग्नता असलेल्या मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देऊन त्यांचा बौद्धिक व मानसिक विकास साधण्यासाठी पालक, समाज यांच्या विशेष प्रयत्नांची गरज असल्याचे केंद्र सरकारच्या दिव्यांगजन सशक्तीकरण विभागाचे आयुक्त एस. गोविंदराज यांनी आज येथे सांगितले.




जागतिक स्वमग्नता दिनानिमित्त संवेदना प्रकल्पात लातूर जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, संवेदना प्रकल्प आणि सक्षम देवगिरी प्रांत आणि जिव्हाळा पालक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी श्री. गोविंदराज बोलत होते. यावेळी राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्त प्रवीण पुरी, दिव्यांगजन सशक्तीकरण विभागाच्या केंद्रीय सल्लागार समितीचे सदस्य सुरेश पाटील, समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, संवेदना प्रकल्पाचे अध्यक्ष डॉ. राजेश पाटील, कार्यवाह डॉ. योगेश निटूरकर आणि उमंग इन्स्टिट्यूटचे डॉ. प्रशांत उटगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

लवकर निदान आणि नियमित उपचारांमुळे कोणत्याही प्रकारच्या दिव्यांगत्वाची तीव्रता कमी होऊ शकते. स्वमग्नता असलेल्या मुलांना सुरुवातीच्या काही वर्षांत चांगले उपचार आणि योग्य शिक्षण दिल्यास त्यांची स्वमग्नता कमी होऊन ते सामान्य जीवन जगू शकतात. त्यांच्यातील कलागुण आणि कौशल्यांना चालना देण्यासाठी शासन, प्रशासनासह समाजाच्या सहभागाची आवश्यकता आहे. दिव्यांग बांधवांना प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी आणि सक्षम बनविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या प्रयत्नांना समाजातील विविध संस्था आणि नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन श्री. गोविंदराज यांनी केले. गर्भवती महिलांचा आहार आणि मानसिक स्थिती यांचा परिणाम मुलांमध्ये दिव्यांगत्व निर्माण होण्यावर होऊ शकतो. त्यामुळे गर्भवती महिलांना सकस आहार आणि मानसिक संतुलन राखण्याची काळजी घेण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

लवकर निदान आणि उपचारांमुळे स्वमग्नतेची तीव्रता कमी होते. त्यामुळे या दिव्यांगत्वाची लक्षणे, कारणे आणि उपचार यांविषयी समाजात जनजागृती होणे आवश्यक आहे. संवेदना प्रकल्पातील याविषयीच्या कार्यशाळेमुळे याबाबत जाणीव निर्माण होईल, असे मत राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्त प्रवीण पुरी यांनी व्यक्त केले. राज्य शासन दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष शाळा चालवते. देशात अशा शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. याशिवाय, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती आणि विविध उपक्रमांसाठी निधी उपलब्ध करून दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता राजू गायकवाड, श्रीमती येडले, दिपक क्षीरसागर, पारस कोचेटा, श्याम शेटे यांनी प्रयत्न केले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (८२) अमर

एकदा एका गृहिणीने गुरुजींना विचारले गुरुजी तुम्ही सतत भ्रमण करत असता. दररोज एक नवे गाव , नवा प्रदेश, नवी भाषा व नव्या वाटा असतात तुमच्या. पण रोज नव्याला सामोरे जाताना अपरिचितासारखे वाटत असेल.

गुरुजी तात्काळ उत्तरले कधीच नाही. एक वेळा भारतमातेला आपला समजलो आहे, मग सारेच देशवासी आपला परिवार आहे असेच वाटते तुम्ही पण माझ्याबरोबर एकदा चला. आत्मीयता अनुभवा. तुम्हाला पण सारा देश एक कुटुंब वाटेल.

गृहिणीः- गुरुजी पन्नास वर्षानंतर संघाचे भविष्य काय असेल ?

गुरुजी :- पुढील पन्नास वर्षेच का पन्नास हजार वर्षानंतर सुद्धा संघ विचारांची आवश्यकता साऱ्या देशालाच नव्हे विश्वाला असेल. आपली भारत माता विश्वगुरू होईल. कारण संघाचे कार्य

व्यक्तीनिर्माण करणे हे आहे. संस्कृती व जीवनमूल्यवर आधारित संस्कारांची निर्मिती संघात होते. युगयुगांतराची आमची निरंतर प्रार्थना आहे सर्वेऽपि सुखिनः संन्तु।

सर्वे संन्तु निरामयः ।। (सभी सुखी हो और सबकी सभी अनिष्टोसे मुक्ती हो) हा याचा अर्थ. आज वर्तमानातील इतर देश 'अधिकतम संख्या का अधिकतम हित' यालाच आदर्श मानतात. तेव्हा संघ विश्वातील सर्वच

प्राणीमात्रांचे पूर्ण कल्याण हाच उदात्त आदर्श सर्वांना समजावून सांगत असतो. संघाची ही विचारधारा अनमोल आहे. संघाची ही साधना संघाला अमर बनवेल. जसे गणपती बाप्पाला आवडणाऱ्या दूर्वा कधीच नष्ट होत नाही. जेव्हा जेव्हा अवसर मिळतो, गरज उत्पन्न होते, तेव्हा तेव्हा दूर्वा परत हलू डोलू लागतात. अशा रीतीने आम्ही 'वाहतो ही दुर्वांची जुडी' ही जुडी भविष्यातही अमर आहे. क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# पैठणला अभूतपूर्व उत्साहात प्रभू श्रीराम जन्मोत्सव साजरा

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०६ :- हजारो रामभक्तांच्या उपस्थितीत रामनवमी निमित्य श्रीक्षेत्र पैठणला भगवान प्रभू श्रीराम यांच्या प्रतिकृती मूर्तीची भव्य शोभायात्रा काढून अभूतपूर्व उत्साहात रामनवमी साजरी करण्यात आली.श्रीक्षेत्र पैठणच्या दक्षिण काशीत चैत्र शुद्ध नवमी शुभ पर्वावर शहरातील मंदिर व मठामधुन श्रीराम नवमी उत्सव भक्तीमय वातावरणामध्ये साजरा करण्यात आला. शहरातील दुर्गावाडीतील बालाजी मंदिर,गावातील नाथ मंदिर,जर गल्लीतील राम मंदिर,जोगेश्वरी संस्थान उत्तर जायकवाडी,कावळे गल्लीतील संत अमृतराया मठात अदि ठिकाणच्या मंदिर व मठामधुनही राम नवमी पर्वावर भजन, किर्तन प्रवचन अदि कार्यक्रमांनी उत्सव साजरा करण्यात आला.

संत एकनाथ महाराजांनी त्यांच्या पैठण येथील राहत्या वाड्यात भावार्थ हा रामायण हा ग्रंथ लिहीला आहे.प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही पैठणनगरीला संपूर्णतः भगवे स्वरूप मिळाले.यासाठी छत्रपती शिवाजी महाराज स्मारकात भव्य आकर्षक सजावट करण्यात आली. रामनवमी उत्सव समितीच्या वतीने



पूर्वसंध्येला तरुणांनी बाईक रॅली काढून राम नामाचा जयजयकार केला.रविवारी सकाळी खंडोबा महाराज चौकातून हजारो रामभक्तांच्या उपस्थितीत भगवान श्रीराम यांच्या प्रतिकृती मूर्तीची शोभायात्रा काढण्यात आली. यावेळ, युवा सरपंच शिवराज भुमरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरीक्षक संजय देशमुख,माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे,माजी उप नगराध्यक्षा सुचित्रा महेश जोशी, शिवराज पारीक,भाऊ निवारे, निलेश परदेशी, सरपंच किशोर चौधरी,शहरप्रमुख तुषार पाटील,शहरप्रमुख सिद्धार्थ परदेशी, नगरसेवक भूषण कावसणकर,माजी शहरप्रमुख खुशालराव भवरे,अमोल पाटील जाधव,किशोर तावरे,बाळासाहेब पठाडे, योगराज बुंदीले,अँड राजेंद्र गोर्डे ,अँड नरेश माणधने, अँड मयुरेश औटे,सरपंच आबासाहेब गिरगे,रुपेश परदेशी,अशोक वाघ,कपिल कावसणकर,प्रकाश चव्हाण,मनीष औटे,देवेंद्र लखमले,यश परदेशी,विकी खांडेकर,अक्षय सपकाळ,ऋषी तांबटकर,गणपत मिटकर,आदेश परदेशी,ऋषी अय्यर,गौरव खताडे सह हजारो रामभक्त उपस्थित होते. शोभायात्रेत सहभागी रामभक्तांसाठी जागोजागी भक्तांनी थंड पेय सुविधा दिली.भगवान प्रभु रामचंद्र त्रेता युगात पैठणला येऊन गेल्याचा इतिहास सांगतो. गोदा काठावरील जुन्या तेलवाडी येथे प्रभू रामचंद्रांनी महादेवाच्या पिडीची स्थापना केली.याठिकाणी सप्ताहाद्वारे मोठ्या उत्साहात राम नवमी उत्सव साजरा करण्यात आला.

## भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव राजाबाजार जैन पंचायत मंदिरात बैठक संपन्न
## भ. महावीर जन्मकल्याण रौप्य महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी खंडेलवाल समाजाची वज्रमुठ

छत्रपती संभाजीनगर : भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव अंतर्गत राजाबाजार जैन पंचायत मंदिरात गुरुवारी झालेल्या बैठकीत तन-मन-धनाने सक्रियतेने रौप्य महोत्सव यशस्वी करण्याची खंडेलवाल समाजाने वज्रमुठ बांधली.

प्रारंभी अध्यक्ष महावीर पाटणी, स्वप्निल पारख, प्रतीक साहूजी, निलेश जैन, बाहुबली वायकोस, प्रमोद पाटणी,पचायत सचिव प्रकाश अजमेरा, विलास साहुजी, रवी मुगदिया, मुकेश साहुजी, संगीता संचेती, सारिका साहूजी, सविता लोढा, ललिता साखला, मनीषा भन्साळी, आदींच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन झाले.

पचायत अध्यक्ष महावीर



पाटणी यांनी सक्रिय योगदानाबाबत माहिती देऊन यशस्वीतेचे आवाहन केले. रवी मुगदिया यांनी नवकार जाप संकल्पनेची माहिती दिली. विलास साहुजी यांनी उपक्रमाचा अभ्यासू आढावा घेतला. प्रमोद पाटणी यांनी उपक्रम सांगितले. सांस्कृतिक कार्यक्रमाची माहिती मनीषा भन्साळी यांनी दिली. अनिल संचेती यांनी जितो उपक्रमाचे माहिती दिली.

मेघना बडजाते यांनी कचरा निर्मूलन, प्लास्टिक मुक्ती अभियानाची माहिती दिली संजय संचेती यांनी जुन्या पिढीचे योगदान सांगून पाठशाळेचे महत्व विषद केले. चंद्र सागर धर्मशाळेच्या राजकुमार गंगवाल श्रेणिक कासलीवाल यांनी व्याख्यानमालेची माहिती दिली. ॲड. यतीन ठोले यांनी समिती स्थापनेच्या पूर्व आठवणींना उजाळा दिला.

सूत्रसंचालन सचिव प्रकाश अजमेरा यांनी केले महोत्सव समिति पत्रिका व चंद्रसागर धर्म शाला चा ७५ व्याखान मालेचा पत्रिका विमोचन केले. यावेळी अरुण पाटणी, सतोश सेठी यतीन ठोले चदा कासलीवाल कीरन पहाडे संजय पापडीवाल जितेंद्र पाटणी, महावीर ठोळे, कविता अजमेरा चादमल सुराना , मीना पापडीवाल, मंजू पाटणी, आशा कासलीवाल, किरण पांडे, नीता ठोळे, कैलास कासलीवाल दिगबर क्षीरसागर प्रसाद पाटनी अमोल पुर्णेकर, नरेंद्र अजमेरा वृशब कासलीवाल मदनलाल अच्छा, राजेश मुथा, रमेश पाटनी कीरन गगवाल बापू कासलीवाल निरज बडजाते प्रमोद पाडे विनोद बोकडिया, सुराणा डॉ. शैलेश चांदीवाल राखी गगवाल महावीर सेठी आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात जागतिक जल व वन दिनानिमित्त व्याख्यान

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ एप्रिल

येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे जागतिक जल व वन दिनानिमित्त दोन दिवशीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.या व्याख्यानमालेसाठी मराठवाड्यातील भूजल व वनसंपदा यावर काम करणारे नामवंत व्याख्याते बोलावण्यात आले होते.या व्याख्यानमालेतील पहिले व्याख्यान दि.३ एप्रिल २०२५ रोजी संपन्न झाले. प्रा.डॉ.प्रमोद पाथ्रीकर भूगर्भशास्त्र विभाग,राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री यांच्या जलस्त्रोतांचे संरक्षण आणि नागरिकांची भूमिका या विषयाने झाली.प्रत्येक विद्यार्थ्यांने जल संवर्धन व त्याचे संरक्षण



करण्याची भूमिका घेतली पाहिजे. पृथ्वीतलावरील पाणी वाचले तर जीवसृष्टी वाचेल आणि म्हणून प्रत्येक नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करून पाण्याची शुद्धता व त्याचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. भोरे शत्रुघ्न उद्धव यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गणेश गायकवाड यांनी केले. शेवटी प्रा.श्रीकृष्ण परिहार यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमासाठी प्रा.डॉ. दिलीप बिरुटे,डॉ.प्रमोद पवार, डॉ.भास्कर टेकाळे व इतर प्राध्यापक,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी,विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.व्याख्यान मालेच्या यशस्वीतेसाठी डॉ.पंकज शिंदे यांनी परिश्रम घेतले.

दि.४ एप्रिल २०२५ रोजी दुसरे व्याख्यान डॉ.सचिन मोरे, भूगोल विभाग प्रमुख,राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री यांचे होते. त्यांनी वन दिनाच्या निमित्ताने वन संवर्धन आणि नागरिकांची भूमिका याविषयी आपले मत मांडले. पृथ्वीवरील जीवसृष्टीचे अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल तर आपण वने जोपासली पाहिजेत. दरवर्षी केवळ वृक्ष लागवड करून चालणार नाही तर लावलेली वृक्ष जोपासणे गरजेचे असल्याचे सांगितले.

# यशवंत विद्यालयात ३४ वर्षानंतर भरली शाळा

सिल्लोड दिनांक ५ मार्च : पालोद येथील यशवंत विद्यालयात १९९१-९२ च्या दहावीच्या विद्यार्थ्यांचे ३४ वर्षानंतर शाळा भरली.

यशवंत विद्यालय पालोद येथे छडी लागे छम छम विद्या येई घमघम

नेहमीच्या वेळी शाळेची घंटा वाजली.. परत एकदा कावरी बावरी होऊन मुलं आत मध्ये आली... एकमेकांचे बदललेले चेहरे, हावभाव निरखून पाहू लागली... जणू काही आज परत एकदा शाळेचा पहिला दिवसच... आणि इकडे मातीच्या गोळ्याला घडलेलं पाहून यशवंत विद्यालय पालोदच्या दगडी भिंती गहिवरून गेल्या... माजी विद्यार्थी आणि माझी शिक्षकांच्या सह सर्वांचे मन भरून आले.. आणि प्रत्येकाच्या मनात एकच विचार आला... छडी लागे छम छम विद्या येई घमघम..

माझी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्ताने परत एकदा एकत्र आलेले सर्व माजी विद्यार्थी आठवणीत हरवून गेले होते. प्रत्येकजण आपली शाळा आता कशी दिसते, हे डोळ्यांमध्ये साठवून घेत होता. वर्ग मित्र भेटल्याचा आनंद सर्वांच्याच



चेहऱ्यावर दिसत होता. विशेष म्हणजे सवयीनुसार शिस्तप्रिय माझी शिक्षक मुलांच्याही अगोदर शाळेमध्ये उपस्थित होते. आणि खरंच माझ्या शाळेसारखी शाळाच नाही असा भाव प्रत्येकाच्या मनोगतातून व्यक्त होत होता.

वयाच्या ५० व्या वर्षात तत्कालीन विद्यार्थ्यांनी स्नेहमिलन मेळावा शाळेत आयोजित केला होता. विद्यार्थ्यांनी परिचय करून देताना आपला व्यवसाय , आपली मुले मुली काय करतात, सध्याची परिस्थिती याबद्दल एकमेकांशी हितगुज केले व शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. अनिता जाधव या विद्यार्थिनीने येथे जमला संत मेळा हे भजन सादर केले तर मुंबई, पुणे ,नाशिक, संभाजीनगर, परभणी, जालना इत्यादी ठिकाणाहून जवळपास चाळीस विद्यार्थी व पंधरा मुली या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून तत्कालीन मुख्याध्यापक दिवाणराव शिंदे, आदर्श शिक्षक तेजराव जंजाळ ,आकाशराव पांढरे ,रामकिसन गायकवाड, ज्ञानेश्वर काकडे ,हिम्मत दांडगे, बाबू पठाण हे शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

रामकिसन गायकवाड यांनी पती व पत्नी या दोघांच्याही आई-वडिलांची सेवा करण्याची अपेक्षा विद्यार्थ्याकडून व्यक्त केली व आपल्या खास शैलीत आई ही कविता सादर करून विद्यार्थ्यांच्या डोळ्यात पाणी आणले. जीवनात संघर्ष अटळ आहे प्रत्येक अडचणीवर मात करण्याची क्षमता तुमच्यामध्ये आहे व ती तुमच्या मुलांमध्ये तुम्ही निर्माण करावी अशी अपेक्षा दिवाणराव शिंदे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली. आकाशराव पांढरे यांनी या शाळेसाठी आम्ही सर्वस्व दिले व आजही ही शाळा तालुक्यात एक आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते असे प्रतिपादन केले. तुमच्या चेहऱ्यावरचा ओसंडून वाहणारा आनंद हाच आमच्या जीवनाचं खरं फलीत आहे असं आम्ही समजतो असे ज्ञानेश्वर काकडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले. स्नेहमिलन कार्यक्रमाच्या तयारीसाठी भगवान पालोदकर, मुनाफ पठाण, गणपत सोनवणे, राजू सोनवणे , बाजीराव डापके आदींनी विशेष परिश्रम घेतले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील वर्पे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी बाजीराव हासे अरुण कोळी, वाळू निकम देविदास झरेकर, ज्ञानेश्वर निकम ,राजू लांडगे गजानन जोशी ,सय्यद नझीर दिनकर दुधे ,नाना बावस्कर संजीव दांडगे, विष्णू कारले, विष्णू ढोरमारे, वसंत वर्पे ,जनार्दन जंजाळ, तुलसीदास जंजाळ, महेश भाले ,आशा दांडगे, छाया मंगरूळकर, स्वपना कुलकर्णी, गजरा काटकर, मीनाक्षी खेळवणे, आशा वर्पे, रंजना ढोरमारे, अनिता सोन्ने, पुष्पा खेळवणे, वंदना केनेकर, अनिता जाधव, मंजुळा जाधव द्वारका खेळवणे, तारा बोर्डे इत्यादी विद्यार्थी उपस्थित होते.

## जायंटस ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर प्राइड व भाग्यश्री फाउडेशन तर्फे भव्य सामूहिक विवाह सोहळा

छत्रपती संभाजीनगर : विवाह हा मनुष्य जीवनातील १६ संस्कार पैकी एक अत्यंत महत्त्वाचा असा संस्कार आहे. विवाहप्रसंगी मनुष्य त्याच्या सर्व परी करण्याचा प्रयत्न करतो व अनावधानाने अनावश्यक असा खर्च करत असतो. वेळप्रसंगी कर्ज घेऊन सुद्धा विवाहाचे मोठे कार्यक्रम आयोजित केले जातात. या अनावश्यक खर्चाला मात देण्यासाठी जायंटस् ग्रुप ऑफ छत्रपती संभाजी नगर प्राइडच्या व भाग्यश्री फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सामूहिक विवाहाचे आयोजन सर्वश्रेष्ठ मुहूर्ता पैकी सर्वश्रेष्ठ अक्षय तृतीया च्या शुभ मुहूर्तावर दिनांक ३०.०४.२०२५ रोज़ी आयोजित करण्यात आलेले आहे.

यामध्ये इच्छुक जोडप्यांचा सामूहिक विवाह प्रथम हिंदू धार्मिक पद्धतीने करण्यात येणार असून, जोडपे त्यांच्या पद्धतीनुसार सुद्धा विवाह करण्याची सोय करण्यात येईल. यापूर्वी वर्ष २०१८ मध्ये ३३ जोडप्यांचे तसेच २०२४ मध्ये २१ जोडप्यांचे सामूहिक विवाह जायंटस प्राइड तर्फे यशस्वीरित्या करण्यात आला होता. वधू-वरास संसार उपयोगी लागणाऱ्या साहित्यांचे वाटप सुद्धा करण्यात येईल.


सर्व इच्छुक वधू वर परिवारांनी ज्यांचे लग्न संबंध जुळलेले आहेत, त्यांनी ह्या सामूहिक विवाह कार्यक्रमात आपल्या पाल्यांचा विवाह करावा असे आव्हान आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. नाव नोंदणीची अंतिम तारीख १५ एप्रिल २०२५ आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी श्री गोपाल सारडा यांना मो. क्रमांक ९१७२६६६७३९ किंवा श्री सचिन चव्हाण यांना मो. क्रमांक ७७७६०३०७५० वर संपर्क साधावा व ह्या संधीचा लाभ घ्यावा.

## सोयगावात भाजपातर्फे स्थापना दिवस साजरा



सोयगाव,दि.६ एप्रिल : शहरात ४५ वा स्थापना दिवस भाजपा तर्फे उत्सवात साजरा करण्यात आला.यावेळी ध्वजारोहण करण्यात आले. तसेच ऑनलाईन बैठकीत कार्यकर्तेनी सहभाग घेतला होता.यावेळी तालुका अध्यक्ष बद्री राठोड,माजी नगराध्यक्ष कैलास काळे,माजी सरपंच वसंत बनकर,माजी उपनगराध्यक्ष तथा भाजपा सोयगाव शहराध्यक्ष योगेश पाटील,सुनील गवाडे,नगरसेवक राजेंद्र जावळे,जरंडी उपसरपंच संजय पाटील,विशाल गिरी,मंगेश सोहणी,मयूर मनगटे,सुनील ठोंबरे,मोतीलाल वाघ,दिलीप पाटील,आकाश पाटील,दिपक पाटील,साधूनाथ चौहान,योगेश मानकर,राहुल परदेशी,प्रमोद पाटील आदींसह मोठय़ा संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## बिडकीन येथे श्रीराम नवमी व संत कैकाडी महाराज जयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ६ एप्रिल पैठण तालुक्यातील बिडकीन येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ आज दि ६ एप्रिल रोजी सकाळी संत कैकाडी महाराज यांची जयंती व श्रीराम नवमी उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी कैकाडी समाज बांधव सेवा निवृत्त मुख्याध्यापक रावसाहेब जाधव व सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या हस्ते संत कैकाडी महाराज व प्रभु श्रीराम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करुन महाआरती करुन अभिवादन करण्यात आले यावेळी बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके,चिमण जाधव, सेवा निवृत्त मुख्याध्यापक रावसाहेब जाधव, सुभाष जाधव, सुजित जाधव, संजय जाधव,भूषण जाधव, विशाल जाधव, गणेश जाधव, नितिन जाधव, राजू गायकवाड, काकासाहेब टेके, मधुकर सोकटकर,मोहन हिवाळे, जगदिश अंबिलवादे, राहुल ठाणगे, कल्याण शिंदे, आनंदा ठाणगे, कांता डोळस,दामु हाडे, आदी समाज बांधव व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती होती तसेच बिडकीन बजरंग दल कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

## भाजपा स्थापना दिना निमित्ताने पिशोर, येथे बैठक

खुलताबाद प्रतिनिधी - कन्नड येथे भारतीय जनता पार्टी कन्नड पूर्व मंडळाच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाला उपस्थित राहून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे मार्गदर्शन पर मनोगत ऐकले. या कार्यक्रमास मुख्य वक्ते म्हणून भाजपा जिल्हा उपाध्यक्ष व कन्नड पुर्व मंडळ प्रभारी श्री. प्रकाशजी वाकळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी भाजपा प्रदेश सदस्य गणेश घुगे, कल्याण पाटील जंजाळ, तालुका सरचिटणीस श्रीराम पाटील जंजाळ, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष गणेश नागरे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष रुमदेव चव्हाण, किसान मोर्चा तालुका अध्यक्ष भक्तराज पाटील मुळे, पप्पु सेट दवंगे, कृष्णा बोराडे, विकास राजपूत, प्रमोद पवार, गणेश सोनवणे, कृष्णा मुळे सह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी बुथ प्रमुख शक्ती केंद्र प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## 'सुशीला-सुजीत'च्या ट्रेलरचे प्रकाशन

छत्रपती संभाजीनगर : स्वप्नील जोशी, सोनाली कुलकर्णी आणि प्रसाद ओक यांच्या भूमिका आणि त्यांचे पहिल्यांदाच एकत्र येणे, यामुळे चर्चेत असलेल्या सुशीला सुजीत च्या नव्याने आलेल्या ट्रेलरमुळे प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. या ट्रेलरमधील धमाल प्रसंग प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळवत आहेत. एका शानदार समारंभात मंगळवारी या ट्रेलरचे प्रकाशन झाले. उंची निर्मितीमूल्ये, दमदार अभिनय, खुमासदार प्रसंग आणि खिळवून ठेवणारे संवाद ही सुशीला-सुजीतची वैशिष्ट्ये या ट्रेलरमधून अधोरेखित होतात. चित्रपट १८ एप्रिल रोजी सर्वत्र प्रदर्शित होत आहे. या ट्रेलर मधून काहीतरी भन्नाट पाहायला मिळणार, हे नक्की. एक आई पोलिसांकडे जाते आणि आपला मुलगा हरवलाय म्हणून तक्रार करते. पोलिस तिला घरात भांडण वगैरे काही झालं होतं का, म्हणून विचारतात. पार्श्वभूमीवर आवाज येतो की, मुलगा हरवलेल्या गोष्टीला तब्बल ३५ तास उलटून गेलेत.तिकडे स्वप्नील आणि सोनाली कुलकर्णी एका घरात बंद दाराआड अडकल्याचे पाहायला मिळते.

## व्हायट्रिस सलग चौथ्या वर्षी भारतातील ग्रेट प्लेस टू वर्क म्हणून प्रमाणित

छत्रपती संभाजीनगर, : मायलन लॅबोरेटरीज लिमिटेडला सलग चौथ्या वर्षी भारतातील ग्रेट प्लेस टू वर्कएँ प्रमाणपत्र' प्राप्त होऊन मान्यता मिळाली आहे. ही मान्यता सर्वसमावेशकता, प्रतिबद्धता आणि कर्मचार्यांच्या कल्याणाची संस्कृती वाढविण्यासाठी व्हायट्रिस ची अविचल वचनबद्धता अधोरेखित करते.बाजार-प्रणीत महसूल, कर्मचार्यांची धारणा आणि वाढीव नाविन्यपूर्णतेसाठी सिद्ध झालेले ग्रेट प्लेस टू वर्कएँ हे कामाच्या ठिकाणी संस्कृती, कर्मचार्यांचा अनुभव आणि केलेले नेतृत्व वर्तन या क्षेत्रातील जागतिक अधिकारी आहे. मूल्यांकनाचा एक भाग म्हणून, ग्रेट प्लेस टू वर्कएँ इन्स्टिट्यूटने ग्रेट प्लेस टू वर्कएँ ट्रस्ट इंडेक्सऊ कर्मचारी सर्वेक्षणाचा वापर करुन व्हायट्रिस इंडियामधील सहकार्यांचा दृष्टिकोन समजून घेतला. आणी परिणामातच उत्तर दडलेले आहे - सर्वेक्षणाचा भाग असलेल्या ८५% व्हायट्रिस इंडियामधील सहकार्यांनी सांगितले की व्हायट्रिस इंडिया काम करण्यासाठी उत्तम ठिकाण असल्याचे त्यांना वाटते!

## महिलांनी आर्थिक साक्षरतेला प्राधान्य दिलेच पाहिजे

मुंबई- सँडविच पिढीतील महिलांनी आर्थिक साक्षरता तसेच त्यांच्या आर्थिक नियोजनाचे नियंत्रण स्वतःच्या हाती घेण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे एडलवाइज लाइफचे चीफ डिस्ट्रिब्यूशन ऑफिसर अनुप सेठ म्हणाले. या संदर्भातील एक अहवाल कंपनीतर्फे अलीकडेच प्रकाशित करण्यात आला. या अहवालानुसार, या पिढीतील ५०% महिलांना आर्थिक गुंतवणुकीच्या साधनांबद्दल असलेली अपुरी माहिती, हे संपत्तीनिर्मिती करण्यामागील एक आव्हान असल्याचे दिसून आले आहे.सँडविच पिढी म्हणजे ३५ ते ५४ या वयोगटातील पिढी. या वयोगटातील व्यक्तींवर वृद्ध पालक आणि वाढत्या वयातील मुले या दोघांची जबाबदारी असते.

## कल्की कोचलीनने वाढवली रनवेची शोभा

मुंबई - मॅक्स फॅशनने लॅक्मे फॅशन वीकु एफडीसीआयच्या २५ व्या पर्वात मोठ्या दिमाखात आणि नवे बदल घडवत पदार्पण केले आहे. या ब्रँडचा चेहरा असलेल्या कल्की कोचलीन यांच्यासोबत हे पदार्पण करण्यात आले. या घटनेमुळे भारतीय फॅशन जगतात फार महत्त्वाचे बदल घडून आले आहेत. देशातील सर्वात मानाच्या रनवेवर मॅक्सने हाय-स्ट्रीट स्टाईलचे एक नवे रूप सादर केले. हे फक्त रनवेवरील पदार्पण नव्हते. ही एक सांस्कृतिक घडामोड होती. हा एक विचार होता जागतिक फॅशन सगळ्यांसाठी असते, सर्वांना उपलब्ध, ट्रेंडप्रमाणे चालणारी आणि सहज करता येईल अशी स्टाईल यात नावाजण्यात येत आहे. मॅक्स फॅशनने सिसिलियन समर आणि अमाल्फी एस्केप कलेक्शन सादर करून हाय स्ट्रीट फॅशनला एक नवे स्वरूप दिले आहेच. पण त्याचबरोबर लाखो ग्राहकांच्या महत्त्वाकांक्षा त्यांच्या कवेत आणून सर्वांसाठी समान संधीही निर्माण केली आहे.

## पॅरीमॅचच्या नवीन गेममध्ये सुनील नरेन

मुंबई - वापरकर्त्यांच्या प्रवासात ब्रँड ॲम्बेसेडरना आणणे हे प्रेक्षकांशी अधिक खोलवरचे नाते निर्माण करण्याचा एक प्रभावी मार्ग बनला आहे. स्पोर्ट्स सिम्युलेशन असो किंवा लाइफस्टाइल ॲप, ओळखण्यायोग्य व्यक्तिमत्त्व सादर केल्याने केवळ ब्रँड लॉयल्टीच नाही तर वापरकर्त्यांची सहभाग देखील वाढतो. आयगेमिंग क्षेत्रात, हा दृष्टिकोन बहुतेकदा अशा प्रतिष्ठित खेळाडूंवर लक्ष केंद्रित करतो ज्यांचा प्रभाव क्षेत्राच्या पलीकडे पसरतो - त्यांना ब्रँडचे चिरस्थायी प्रतीक बनवतो. पॅरीमॅच, १ जागतिक गेमिंग प्लॅटफॉर्म, क्रिकेट सेन्सेशन निकोलस पूरन आणि गूढ गोलंदाज सुनील नरेन यांसारख्या क्रीडा दिग्गजांसोबत भागीदारी करून हे स्वप्न प्रत्यक्षात आणते. हे सहकार्य ब्रँड ओळख मजबूत करतात आणि चाहत्यांना त्यांच्या आवडत्या खेळांच्या आणि खेळाडूंच्या जवळ आणतात.

## झी टीव्हीवर 'सरु'मध्ये मोहक मटकरची प्रमुख भूमिका

भारतात छोट्या छोट्या शहरातील अनेक स्वप्नाळू आपल्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहत असतात. शिक्षण, खेळ आणि कला हे त्यांच्या स्वप्नांसाठी दरवाजे उघडत असले तरी मोठ्या शहराचा हा प्रवास त्यांच्या चिकाटीची परीक्षा पाहण्यासाठी त्यांच्यासमोर अनेक आव्हाने आणतो. प्रेरणादायी आणि आपल्याशा वाटतील अशा कथा सांगण्याच्या आपल्या वारशासाठी मानली जाणारी झी टीव्ही ही वाहिनी अशीच एक कथा - 'सरू' - प्रस्तुत करत आहे. आपल्या छोट्या शहराच्या मर्यादांच्या पलीकडे जाऊन स्वप्ने पाहण्याचे धाडस करणाऱ्या एका तरूण मुलीची ही रोचक कथा आहे.

## तेनाली रामा' मालिकेत राजा चौधरीची एंट्री

सोनी सबवरील 'तेनाली रामा' मालिकेत तेनाली (कृष्ण भारद्वाज) या महान दरबारी कवी आणि चतुर रणनीतीकाराच्या वेधक गोष्टींनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. आत्ता एका नवीन साम्राज्य आणि त्याचा सामर्थ्यशाली राजा चौडप्पा राया (राजा चौधरी) यांच्या एंट्रीमुळे कथानकाला एक जबरदस्त वळण मिळाले आहे आणि एका थरार नाट्याची सुरुवात झाली आहे. कसलेला अभिनेता राजा चौधरी या मालिकेत चौडप्पा रायाच्या भूमिकेत दाखल होत आहे. तो केलाडी साम्राज्याचा समर्थ राजा आहे.

# मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम

## प्रासंगिक

श्रीराम पुरुषोत्तम बरबडे

सूर्यवंशात दिलीप नावाचा प्रसिद्ध राजा होता. त्याच्या पत्नीचे नाव सुदक्षिणा. त्यांचा पुत्र रघु, ज्याने ९९ अश्वमेध यज्ञ केलेत. शंभराव्या वेळी इंद्राने प्रसन्न होऊन घोड्याशिवाय यज्ञ पूर्ण होईल असा आशीर्वाद दिला आणि तेव्हापासून चक्रवर्ती साम्राज्याच्या या वंशाला रघुवंश म्हणतात. रघुचा पुत्र अज ज्याने विदर्भ देशाचा राजा भोज याच्या इंदुमती नावाच्या कन्येशी विवाह केला. याच अज आणि इंदुमतीचा पुत्र म्हणजे राजा दशरथ. दशरथाला तीन राण्या होत्या कौसल्या, सुमित्रा आणि कैकेयी. पण तिघींनाही पुत्र नव्हता. दशरथाने पुत्रकामेष्टी यज्ञ केला आणि फलस्वरूप कौसल्येला राम, सुमित्रेला लक्ष्मण व शत्रुघ्न आणि कैकेयीला भरत असे चार पुत्र झाले. श्रीरामांचा जन्म चैत्र शुद्ध नवमीला अभिजित मुहूर्तावर झाला. बाल्यावस्थेत त्यांनी माता कौसल्येला अखंड अद्‌भुत रूप दाखवले होते. हा एक प्रसंग सोडला तर त्यांचे बालपण तत्कालीन इतर सर्व राजपुत्रांप्रमाणेच होते. तरुणपणी विश्वामित्रांच्या यज्ञरक्षणार्थ त्यांनी त्राटिका, मारीच इत्यादी राक्षसांचा संहार करून दशरथाचा ज्येष्ठ पुत्र या नात्याने उत्तराधिकारी म्हणून वाटचाल सुरू केली. पुढे विश्वामित्रांच्याच आशीर्वादाने श्रीरामांनी प्रचंड दुर्धर अशा शिवधनुष्याला प्रत्यंचा लावून जनकाचा सीता-स्वयंवराचा पण जिंकला व सीतेशी विवाह करून ते अयोध्येत परतले आणि दशरथाने खुश होऊन त्यांच्या राज्याभिषेकाची घोषणा केली.

येथपर्यंत सुरळीत सुरू असलेल्या श्रीरामांच्या जीवनप्रवासाने कैकेयीच्या निमित्ताने कलाटणी घेतली. राज्याभिषेक करून घेण्याच्या तयारीत असलेल्या श्रीरामांच्या नशिबात राजेपण तर दूरच उलट राजधानीचाही त्याग करून वनवास येतो. इथे प्रथमच रामाचे वेगळेपण दिसून येते. सर्वसामान्य माणूस आई-वडिलांच्या इच्छेविरुद्ध बंड करेल, नाराजी व्यक्त करेल, राज्य नको किमान अयोध्येत तरी राहू द्या असे म्हणेल. पण श्रीराम यापैकी काहीच करीत नाही. श्रीराम माता कैकेयीवर अजिबात रागावले नाही, भरताच्या राज्याभिषेकाच्या वार्तेने त्यांना आनंदच झाला. आई-वडिलांच्या इच्छेखातर त्यांच्या वचनपूर्तीसाठी युवराज राम आनंदाने पत्नी सीता आणि कनिष्ठ बंधू लक्ष्मणासह वनवास पत्करतात.

पुत्रवियोगाने मृत्यूचा शाप मिळालेल्या दशरथाचा राम वनवासात गेल्यावर मृत्यू होतो. मामाकडे गेलेल्या भरताला अयोध्येत बोलाविले जाते आणि हा सगळा घटनाक्रम ऐकून भरत प्रचंड क्रोधीत होतो. अत्यंत तीव्र शब्दांत कैकेयीची निर्भर्त्सना करून तो रामाला आणायला वनवासात जातो. ज्यांची वचनपूर्ती करायची त्या पित्याचा मृत्यू झालाय. कैकेयी सुद्धा पश्चात्तापदग्ध झालीय आणि भरत अयोध्येत चलण्याचा हट्ट धरून बसलाय. या संधीचा फायदा राम घेऊ शकत होते, पण इथे दुसऱ्यांदा रामाचे वेगळेपण दिसते. श्रीराम भरताचीच समजूत काढतात आणि आपल्या चरणपादुका देऊन त्याला परत पाठवतात. रामासोबतच इथे भरताचेही वेगळेपण उठून दिसते. समोरून चालत आलेले सिंहासन दोघेही नाकारतात. श्रीराम पित्याची वचनपूर्ती या पुत्रधर्माचे तर भरत सिंहासन ज्येष्ठ बंधूचेच या भ्रातृधर्माचे आचरण करतात.

पुढे शूर्पणखेच्या रूपाने मोहाचाही एक परीक्षेचा क्षण येतो. एकतर वनवासात आणि त्यातही ज्येष्ठ असल्याने भगवान प्रभू रामचंद्रांना नाही कोण म्हणणार? पण स्वतःच स्वतःला घातलेली एकपत्नी व्रताची मर्यादा श्रीरामचंद्र पाळतात. ज्याची परिणती रावणाद्वारे सीताहरणात होते. सीतेचा शोध घेत असताना राम-लक्ष्मणांना हनुमंत आणि सुग्रीव भेटतात. वालीचा वध करताना देखील रामचंद्र आपल्या भात्यातील अमोघ अस्त्र शस्त्र टाळून एका सामान्य बाणाचा प्रयोग करतात जेणेकरून वालीला तत्काळ मृत्यू न येता रामाची व प्रियजनांची भेट होऊन, सर्वांशी बोलून, सर्व शंका निरसन झाल्यावर मृत्यू यावा. मरताना त्याच्या मनात कुठलाही संदेह नसावा. असे करून किष्किंधेचे राज्य सुग्रीवाला परत मिळवून देतात. स्वतः राज्यपदी बसणे तर दूरच पण नगरात जायचे काम पडते तेव्हा लक्ष्मणाला दूत म्हणून पाठवतात आणि आपण स्वतः नगराबाहेर राहतात. वनवास म्हणजे वनवास. प्रतिज्ञापालन. हाच आदर्श



रावणवधानंतर सुद्धा पाळला गेलेला आहे. राम-रावण युद्धात रावण प्रभू रामचंद्रांच्या बाणाने मृत्युमुखी पडतो. त्यानंतर त्याचा उचित अंत्यविधी केला जातो. इथे खरेतर लंकाधिपतीचा वध झाला असल्याने लंका रामांनी जिंकली असते. पण प्रभू लंकेच्या सिंहासनावर बिभीषणाचा राज्याभिषेक करतात. आणि आपण स्वतः सीतेसह अयोध्येला परत जातात.

सत्ता, संपत्ती, स्त्री यांचा मोह भल्याभल्यांना भुरळ पाडतो. चारित्र्य जपताना या वाटा फार निसरड्या असतात. वर आपण पाहिले अयोध्या, किष्किंधा आणि लंका तिन्ही सिंहासने प्रभू रामांच्या हातात होती पण त्यांनी सत्तामोह टाळला आणि निःस्वार्थपणे ज्याची त्याला देऊन टाकली. ऐन तरुणपणात स्वतःची काहीही चूक नसताना केवळ सावत्र मातेच्या इच्छेखातर आणि वडिलांच्या वचनपूर्तीसाठी त्यांनी हक्काच्या राज्यपदाचा त्याग करून वनवास पत्करला. मात्या-पित्यांप्रति कुठलीही नाराजी न ठेवता, न चिडता, बंधू भरताप्रति कुठलीही द्वेषभावना न ठेवता, आनंदाने त्यांनी राज्यत्याग केला. उलट भरत न्यायला आला असता त्यालाही माता कैकेयीला दोष देऊ नको असाच उपदेश केला. पुत्रधर्माच्या पालनाचा एक अत्युच्च आदर्श प्रस्थापित केला. अयोध्या किती वैभवशाली आणि शक्तिसंपन्न चक्रवर्ती साम्राज्य होते ते आपण सुरुवातीलाच पाहिले. रावणासोबत युद्ध अटळ झाल्यावर रामाच्या मदतीला कोणीही नाही म्हटले नसते. पण कुठल्याही प्रस्थापित राजसैन्याला न घेता सामान्य अशा नर-वानर-अस्वल, शोषित, वनवासी, आदिवासी गिरिजन यांचे सहकार्य घेतले. हे सर्व वनवास पत्करल्यानंतर रामाच्या संपर्कात आले होते. अयोध्येचा त्याग करून वनवासात गेल्यावर अयोध्येशी संबंधित कोणाचीही मदत घेणे टाळले आणि वनवासाची मर्यादा निष्ठुरपणे काटेकोर पाळली. किष्किंधा आणि लंका जिंकल्यावरही साम्राज्यविस्ताराचा मोह त्यांना झाला नाही. सुग्रीव आणि बिभीषण त्यांचे मित्रच राहिले. त्यांना अयोध्येचे मांडलिक किंवा गुलाम म्हणून न वागवता मित्रत्वाच्या बरोबरीच्या नात्याने सन्मान दिला. अयोध्येत परतल्यावरही त्यांचा योग्य तो आदर सत्कार केला गेला.

शूर्पणखा तर आपण होऊन तयारच होती. पण वाली वधानंतर तारा व रुमा आणि रावण वधानंतर मंदोदरी यांच्यावरही राम हक्क दाखवू शकले असते. त्याकाळी ती पद्धतच होती. खुद्द दशरथालाही तीन राण्या होत्या. आणि तारा ही तर शास्त्रार्थ जाणणारी विदुषी होती. अहल्या, द्रौपदी, कुंती, तारा, मंदोदरी या महान पंचकन्या. ज्यात तारा आणि मंदोदरीचा समावेश आहे. सत्ता संपत्तीच्या मोहावर विजय मिळवता येईल, पण स्त्री मोह? प्रत्यक्ष विश्वामित्राचीही तपश्चर्या भंग व्हायला मेनकाच कारणीभूत ठरली होती. पण प्रभू श्रीराम सर्व मोह मायांवर विजय मिळवून पती-धर्म सांभाळत एकपत्नी व्रताचे पालन करतात.

प्रभू श्रीरामचंद्र हे विष्णूचा अवतार होते. पण मानवी देह धारण केल्यावर ते मानवी विकारांना बळी पडले नाही हे वरील सर्व प्रसंगांत आपल्याला प्रकर्षाने दिसून येते. उलट संपूर्ण आयुष्य त्यांनी विवेकाने निष्कपट, निरपेक्ष, निर्लोभी, निःस्वार्थी, न्यायी भावनेने व्यतीत केले आणि मानवी देहात असूनही देवत्व प्राप्त केले. दुसऱ्या बाजूने विचार केला असता असे दिसून येते की, विष्णूचा अवतार असल्याने त्यांना अशक्य असे काहीच नव्हते. सर्व दैवी शक्ती त्यांच्या पाठीशी होत्या. पण हे माहीत असूनही आता आपण मानव देहात आहोत आणि त्या देहाच्या ज्या मर्यादा आहेत त्या मर्यादांचा त्यांनी कधी विसर पडू दिला नाही. सुग्रीव आणि वाली युद्धात शरीर साधर्म्यामुळे सुग्रीवाला ओळखू न शकणे असा उल्लेख आहे. ही दैवी अवताराची नाही सामान्य माणसाचीच मर्यादा आहे. अगदी रावणासोबतच्या मायावी युद्धात किंवा शेवटी एक शिर उडविल्यावर लगेच दुसरे शिर तयार दिसताना देखील त्यांनी दैवी शक्तीने हे जाणले असे होत नाही तर बिभीषण त्यांना रावणवधाचा मार्ग सांगतो आणि कुठलाही दैवी चमत्कार न करता प्रभू श्रीरामचंद्र आपल्या मानवी देहाच्या मर्यादा जपत, सांभाळत आपल्या अवताराचे विहित कर्तव्य जे की रावणवध ते पूर्ण करतात.

मानवी देहात असून मानवी विकारांना बळी न पडणे आणि दैवी अवतार असूनही, नरदेहाच्या मर्यादेत राहून कुठलेही चमत्कार न करता नरदेहाला शक्य आहेत त्या आणि तेवढ्याच मार्गांनी लक्ष्यप्राप्ती व रावणवध केलेल्या मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामचंद्र यांचा आदर्श प्रत्येकाने ठेवून त्याप्रमाणे सदाचरण करण्याचा प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. आज आपल्या पारंपरिक मूल्यसंस्था ढासळत असताना, तरुणांसमोर कुठलाही आदर्श नसताना, श्रीरामाचे स्मरण करणे, श्रीरामकथेचे श्रवण करणे आणि प्रभू श्रीरामचंद्रांचा आदर्श ठेवून संस्कारांची पुनर्स्थापना करणे महत्त्वाचे आहे. आज श्रीरामनवमीच्या दिवशी हाच संकल्प करूया. जय श्रीराम.


९९२११३७९९९

# मनोजकुमार नव्हे, भारतकुमार...

## श्रद्धांजली

संजय तिवारी

या मायावी दुनियेत येणं, आपलं कौशल्य पणाला लावणं आणि त्या कौशल्याच्या सोबतीला नशिबाचीही साथ आहे, हे सिद्ध करणं हे वाटतं तेवढं सोपं काम नाही. इतकं सारं असेल तर इथला रसिक मायबाप तुम्हाला एका विशिष्ट प्रतिमेच्या चौकटीत अडकवून मोकळा होत असतो. ही प्रतिमा आणि चौकट अर्थात बऱ्याचदा तुमच्या कर्तृत्वाच्या शिखरांची उंची मर्यादित ठेवत असतात. चित्रपटसृष्टीत तर याचा प्रत्यय वरचेवर येत असतो. मात्र ही 'प्रतिमा' हीच ज्यांची खरी ओळख असते, अशा काही भाग्यवान कलावंतांपैकी एक नाव होतं मनोजकुमार. या देशाची सेवा करण्याचा सारा मक्ता आपल्याकडे असल्याच्या थाटात तो वावरायचा. हे देशप्रेम पडद्यावर व्यक्त झालं पाहिजे, यासाठी तो आग्रही असायचा. निर्माण केलेल्या प्रत्येक चित्रपटातून अगदी ठळकपणे व्यक्त केलं. मनोजकुमारसारखा भारतमातेचा सुपुत्र अन्य कोणी नाही असं वाटावं इतकं मनोजकुमारने या प्रतिमेत आपल्याला बांधून घेतलं. एक वेळ कारगिल युद्धात प्राण पणाला लावणाऱ्या खऱ्या जवानांबद्दलचा आदर कमी असेल, पण तीच व्यक्तिरेखा मनोजकुमारने पडद्यावर रंगवली असती तर, त्याला अमाप लोकप्रियता मिळाली असती. असो. हा झाला थोडा अतिशयोक्तीचा भाग. पण यात वस्तुस्थिती सांगणारी सत्यताही आहेच. एखाद्या कलावंताची विशिष्ट छबी रसिकांच्या मनावर कशी साम्राज्य करत असते याचं उत्तम उदाहरण म्हणून मनोजकुमारचं नाव घेता येईल.



मनोजकुमारने आपली कारकीर्द कृष्णधवल चित्रपटांपासून सुरू केली. काही वर्ष रोमँटिक हिरोची भूमिका पार पाडल्यानंतर भारतमातेचा निष्ठावान सेवक अशी त्याची प्रतिमा तयार होत गेली. स्वत:च निर्माण केलेल्या अनेक चित्रपटांमधून एका साध्यासुध्या भारतीयाचा देशीपणा, त्याची संस्कृती याचं दर्शन त्याने घडवलं. आपल्या चित्रपटांमध्ये त्याने नायिकांशी जवळीक ठेवण्याचं प्रकर्षानं टाळलं. आपण 'भारतमाता' असा उल्लेख करतो तेव्हा स्त्रीत्वाशी खेळणं कसं शक्य आहे, असा सवाल मनोजकुमार करतो. १९७० आणि १९८० चं दशक हे मनोजकुमारच्या लोकप्रियतेच्या चढत्या आलेखाचं दशक होतं. अर्थात त्याच्यावर मनापासून प्रेम करणारे फॅन्स भारतभर आहेत. मनोजकुमारने भारतकुमार म्हणून आपली इमेज तयार केलीच, पण इतर प्रकारच्या भूमिकाही त्याने ज्या पद्धतीने केल्या त्या आजच्या पिढीला आदर्श ठराव्यात अशा आहेत. धोती-कुर्ता हा पेहराव त्याने आदर्श पोशाख म्हणून रसिकांच्या मनावर बिंबवला. त्याचं हसणं, नाचणं, गाणं आणि एकूणच वावरणं यामध्ये कधीच भडकपणा नव्हता. साधेपणा हेच त्याचं वैशिष्ट्य होतं. भूमिकेच्या मागणीप्रमाणे त्याने कोट-सूट असे पोशाख वापरले. खालच्या पट्टीतली संवादफेक हे दिलीपकुमारच्या संवादफेकीचं वैशिष्ट्य होतं. मनोजकुमारनेही काहीशी अशाच प्रकारची संवादफेक करणं पसंत केलं.

आज इतर क्षेत्रांप्रमाणेच चित्रपटक्षेत्रही तंत्रज्ञानाच्या बाबतीत फारच पुढारलं आहे. सुमारे पन्नास वर्षांपूर्वी मात्र परिस्थिती अशी नव्हती. छायाचित्रण, स्टील फोटोग्राफी अशा तंत्रज्ञानाच्या बाबतीत फार प्रगती झालेली नव्हती. मात्र असं असतानाही कॅमेऱ्याच्या सर्व अँगल्समधून मनोजकुमार देखणाच दिसत असे. 'पोलाईटनेस' हा मनोजकुमारचा पडद्यावर वाखाणण्याचा गुण होता. आजच्या नटांप्रमाणे अकांडतांडव, आक्रस्ताळेपणा करून केलेल्या अभिनयाला खरा अभिनय मानण्याचा प्रयत्न मनोजकुमारने कधी केला नाही. शांत, संयमी लयीतला अभिनय हे त्याचं गुणवैशिष्ट्य. मनोजकुमारच्या चाहत्यांमध्ये स्त्रियांची संख्या लक्षणीय होती, यामागील कारण बहुधा हेच असावं. मनोजकुमारचा चित्रपट म्हटल्यावर भडकपणा, असभ्यपणा नसणार, याची खात्री प्रेक्षकांना असायची. त्याच्या चेहऱ्यातही एक प्रकारचा साधेपणा असायचा. 'गाव का छोरा' ही त्याची प्रतिमा अधिक सशक्त झाली ती त्याच्या चेहऱ्यात असणाऱ्या या कमालीच्या साधेपणामुळे. कपाळ आच्छादून टाकणारी त्याची केशरचना त्याच्या या प्रतिमेला अधिक पोषक होती. त्याच्या काळातल्या साधना, आशा पारेख, सायरा बानू ते अगदी हेमामालिनीपर्यंत सर्व आघाडीच्या अभिनेत्रींबरोबर मनोजकुमारने नायक रंगवला. गूढगर्भ वाटाव्यात अशा भूमिकांमध्ये मनोजकुमार अधिक रमला. 'वो कौन थी' असो किंवा गाथा ख्रिस्तीच्या कादंबरीवर आधारित 'गुमनाम' असो मनोजकुमारचा पेहराव, त्याचा अभिनय या गोष्टी संस्मरणीय होत्या.

लालबहादूर शास्त्री यांनी दिलेली 'जय जवान जय किसान' ही घोषणा गाजत होती. याच घोषणेला केंद्रस्थानी ठेवून मनोजकुमारने 'उपकार' या चित्रपटाची निर्मिती केली. त्याचा हा चित्रपट 'मेगाहिट' झाला. अशा प्रकारच्या चित्रपटात त्याचा पेहराव पूर्ण शरीर झाकून टाकणारा असल्यामुळे त्याच्या चेहऱ्यावरील अभिनय शोधण्यासाठी कॅमेरामनला खटाटोप करावा लागत असे असं विनोदाने म्हटलं जायचं. प्राणने आजवर रंगवलेला खलनायक मनोजकुमारने 'उपकार'मध्ये पूर्णपणे बदलून टाकला. प्राणने या चित्रपटात रंगवलेला खलनायक अतिशय वेगळ्या प्रकारचा होता. प्राणने नंतरही अनेकदा आपल्या मुलाखतीमध्ये या गोष्टीचा उल्लेख केला आहे आणि आपल्या या वेगळ्या भूमिकेसाठी मनोजकुमारला धन्यवाद दिले होते. आपल्याला वाईट प्रतिमेतून बाहेर काढण्याचं श्रेय त्याने मनोजकुमारला दिलंय. खलनायकालाही त्याची काही बाजू असू शकते हे 'उपकार'मध्ये प्रथमच दाखवलं गेलंय. प्राणप्रमाणेच 'मन्ना डे' या गुणी गायकाच्या आवाजाला मनोजकुमारने मोठा वाव दिला. देशप्रेमावरची त्याने गायिलेली गाणी प्रचंड लोकप्रिय झाली. दरम्यान, 'पूरब और पश्चिम' हा वेगळ्या धाटणीचा सिनेमा मनोजकुमारने निर्माण केला. पाश्चात्त्य संस्कृती, त्यातला फोलपणा लक्षात न घेता त्याचं अंधानुकरण करणारी आपली भारतीय जनता याचं चित्रण 'पूरब और पश्चिम'मध्ये मनोजकुमारने केलं. स्त्रियांमध्ये वाढणारी व्यसनाधीनता हे पाश्चात्त्यांचं अंधानुकरण असल्याचं त्याने चित्रपटामध्ये पटवून दिलं.

कोणताही संदेश देताना तो आपण कोणत्या पद्धतीने देतोय हे अधिक महत्त्वाचं असतं. मनोजकुमारने या गोष्टीचं भान नेहमीच ठेवलं. संदेश तर परिणामकारक रीतीने पोहोचवायचा आणि तो कंटाळवाणा तर होऊ नये, त्याचा थाट प्रचारकी असू नये याची काळजी मनोजकुमारने नेहमीच घेतली. साखरेचं आवरण लावून कडू गोळी दिली तरी ती गोड लागते, हे सूत्र त्याने पक्क लक्षात ठेवलं. त्यामुळेच देशप्रेमाचा संदेश पोहोचवताना त्याला मनोजकुमारने मनोरंजनाची जोड दिली. 'पूरब और पश्चिम'सारख्या चित्रपटातून त्याने दिलेला संदेश प्रेक्षकांच्या गळी उतरला तो त्यामुळेच. संगीतकार रवी यांच्या दिग्दर्शनामुळे 'दो बदन' लोकप्रिय झाला हे खरं, पण त्यातली मनोजकुमारची भूमिका वाखाणण्याजोगी होती. हेमामालिनीबरोबरचा 'संन्यासी'ही गाजला तो मनोजकुमारमुळे. बॉक्स ऑफिसवर हे दोन्ही चित्रपट हिट ठरले ते मनोजकुमारमुळे. 'क्रांती'ने खरोखरच चित्रपटसृष्टीत नवी क्रांती केली. देशप्रेम चित्रपटातून दाखवल्यावर त्याचा परिणाम केवढा व्यापक असतो, याचं नवं परिमाण 'क्रांती'ने घडवलं. दिलीपकुमार, शत्रुघ्न सिन्हा, शशी कपूर यांच्यासारखे मोठे कलाकार 'क्रांती'मध्ये होते, तरी मनोजकुमारचं वेगळेपण उठून दिसलं. 'क्रांती'मध्ये महागडे सेट, भव्य ड्रेपरी यावर भरपूर पैसा खर्च करण्यात आला. परंतु 'क्रांती'ने उत्पन्नाचे विक्रम केल्यामुळे हा खर्च हातासरशी बाहेर पडला.

देशभक्तिपर चित्रपटांना यश मिळतं, पण त्यामध्ये काम करणाऱ्या अभिनेत्यांना तितकंसं यश मिळेलच असं नाही. पण मनोजकुमारसारखे काही अभिनेते त्याला अपवाद असतात. अमिताभ बच्चन, अजय देवगण यांच्यासारखे आघाडीचे कलाकार असूनही देशभक्तिपर चित्रपट कसे आदळतात हे आपण पाहिलं आहे. एखादा अपवाद वगळता देशभक्तिपर चित्रपट गाजण्याबाबत सारा सावळा गोंधळच आहे. पण मनोजकुमारने निर्माण केलेले आणि अभिनय केलेले सारे चित्रपट तिकीट खिडकीवर यशस्वी ठरले. आज तो आपल्यामध्ये नाही, पण त्याच्या देशभक्तीने सजलेल्या भूमिका हिंदी चित्रसृष्टीमध्ये अजरामर राहतील.

## रविवारची पत्रे

### सर्वांचा आदर्श श्रीराम

आदर्श व्यक्ती म्हणून कुणाची प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर येत असेल तर ती म्हणजे श्रीरामचंद्रांची. आयुष्य जगताना आपण जीवन कसे जगावे? हे आपल्याला श्रीराम चरित्र शिकवते. जीवनात अनेक अडचणी येतात, तरीही आपल्या नैतिक मूल्यांवर व आदर्शांवर चालून, त्यांना भेदून कसे पुढे जायचे हे आपल्याला श्रीरामचंद्रांच्या चरित्रावरून कळते. चांगल्या मार्गांवर चालणाऱ्या सर्वसामान्य माणसाला जीवनात अनेक अडचणींना तोंड देताना श्रीरामांचे चरित्र खरोखरच आदर्श ठरू शकते. श्रीरामांनी आपल्या जीवनात आत्मविश्वास व सकारात्मकतेच्या जोरावर मोठ मोठ्या संकटावर विजय मिळवला. खरं तर आत्मविश्वास, सकारात्मकता, नैतिकता, सच्चेपणा हे श्रीरामांच्या जीवनाचे खरे सूत्र होते.

त्याच आदर्श मूल्यांवर ते जीवनभर चालले व पुढील पिढ्यांसाठी एक आदर्श कायम केला. श्रीरामांचे चरित्र सर्वसामान्यांच्या मनात नेहमीच आत्मविश्वास निर्माण करते. श्रीरामांची कथा आपल्याला शिकवते की एक सामान्य व्यक्ती आत्मविश्वास व सकारात्मकतेच्या जोरावर प्रचंड यश मिळवू शकते, असाध्यही साध्य करू शकते. असे असाध्य साध्य करताना जीवनाचे लक्ष्य साध्य करताना, तुम्हाला कुठल्याही विशिष्ट संपत्तीची, विशिष्ट सत्तेची किंवा आप्तस्वकीयांच्या मदतीची आवश्यकता नाही. या सर्वांची मदत न घेता ही व्यक्ती केवळ आणि केवळ स्वतःच्या मेहनत, आत्मविश्वास, सकारात्मकता या गुणांवर उच्च ध्येय गाठू शकते. किंबहुना श्रीरामांचे चरित्र असा ठाम विश्वासच आपल्यात निर्माण करते.

खरे तर श्रीरामांनी कधीही यश मिळवण्यासाठी आपल्या आप्तस्वकीयांची मदत घेतली नाही. स्वतःच्या बळावर त्यांनी आपल्या जीवनात यशाची भली मोठी उंची गाठली. कल्पनेतही अशक्यप्राय वाटणारा रामसेतू त्यांनी प्रत्यक्षात उतरवला, बलाढ्य रावणालाही त्यांनी पराजित केले. श्रीरामांप्रमाणेच मनुष्याला साधेपणा, सरळपणा, स्वच्छ व निर्मळ मन, निःस्वार्थ मन असणारा माणूस मोठ मोठी आमिषे, प्रलोभने याच्या मार्गाने येणाऱ्या संकटांना सहज परतावून लावण्यास समर्थ ठरतो. त्यांचे हेच गुण त्याच्यासाठी श्रीरामरक्षा कवच ठरतात. श्रीरामांनी आपल्या जीवनात सतत संघर्ष केला. मग कुटुंबासोबत असो, वनवासातील जीवन असो, रावणाशी झालेलं युद्ध असो किंवा राजा झाल्यावर प्रजेच्या सुखासाठी असो. हा संघर्ष करताना त्यांनी मेहनत, प्रामाणिकपणा, संघटन कौशल्य, आत्मविश्वास, सकारात्मकता, कुटुंब कल्याण व देशाचे कल्याणाची भावना सदैव ठेवत आपल्या यशाची परंपरा कायम ठेवली.

जेव्हा एखादी माणूस आजही श्रीरामांच्या या तत्त्वांवर चालतो तेव्हा या गुणांच्या जोरावर एखादा शेतकऱ्याचा मुलगा आयएएस अधिकारी होतो, एखाद्या मजुराचा मुलगा वैज्ञानिक होतो, एखाद्या खाण कामगाराची मुलगी देशाची राष्ट्रपती होते, तर चहा विकणाऱ्याचा मुलगा देशाचा पंतप्रधान होतो. हा चमत्कार आजही घडतो तो या राम तत्त्वांवर चालणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात. खरंतर श्रीरामांनी आपल्या आयुष्यात कधीही दैवी चमत्कार केला नाही किंवा त्याचा आधार घेतला नाही. या उलट मनष्याच्या मानवी सदगणांच्या आधारावर स्वतःची सक्षमता वाढवून यश मिळवून मानवी सक्षमतेच्या व विकासाच्या कक्षा रुंदावल्या. श्रीरामांचे हे तत्त्व केवळ भारतीयांपुरतेच मर्यादित नाही तर ते विश्वव्यापक आहे. संपूर्ण विश्वाच्या यशाचा विश्वबंधुत्वाचा पाया ठरू शकणारे तत्त्व म्हणजे श्रीरामांचे रामतत्त्व.

**हेमांगी देशपांडे**/७३५०८२३७४२

### इतिहासाचा विसर की हेतुपुरस्सर दुर्लक्ष?

''सत्य कितीही झाकण्याचा प्रयत्न झाला तरी ते सूर्यप्रकाशासारखे प्रखर असते! पण काही जणांचे डोळेच मिटले असतील, तर त्यांना सूर्यप्रकाशाचे तेज कसे दिसणार?'' नुकत्याच नागपूर येथे पार पडलेल्या एका कार्यक्रमात, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याचे खुलेपणाने कौतुक केले. संघाच्या राष्ट्रसेवेच्या अपार कार्याचा गौरव करताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा केवळ सामाजिक संघटना नसून, तो भारतीय राष्ट्रवादाचा मूळ गाभा आहे. आणि बस्स! एवढे ऐकताच काहींना घशात अडकलेला कडू घोट गिळावा लागल्यासारखी अवस्था झाली. संघाचे नाव जरी कुणी गौरवाने घेतले तरी यांना असह्य होते. स्वातंत्र्यलढ्यात संघ कुठे होता, अशी जुनीच टेप हे पुन्हा वाजवू लागले. पण त्यांचे दुर्दैव असे की, इतिहास त्यांच्या थापांना पुन्हा पुन्हा खोटे ठरवतो आहे!

संघाच्या स्वातंत्र्यलढ्यातील भूमिकेबाबत जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरवली जाते. काही राजकीय ठेकेदार संघाने स्वातंत्र्यलढ्यात कोणतेही योगदान दिले नाही, असा अपप्रचार करत असतात. पण वास्तव काय आहे? ऐतिहासिक दस्तावेज आणि तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास केला तर हे स्पष्ट होते की, संघाचे योगदान केवळ महत्त्वाचेच नव्हे, तर निर्णायक होते. स्वातंत्र्यलढा म्हणजे केवळ तुरुंगात जाणे किंवा ठरावीक आंदोलनांना पाठिंबा देणे नव्हते. राष्ट्रनिर्माणाच्या दीर्घकालीन दृष्टिकोनातून समाज जागृती, युवकांचे संघटन, शिस्तबद्ध संघटन निर्माण करणे आणि राष्ट्रीय विचार बिंबवणे हे सुद्धा स्वातंत्र्यलढ्याचाच एक भाग होते. याच भूमिकेतून संघाचे कार्य उभे राहिले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ मध्ये डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी केली. हे विसरता येणार नाही की, डॉ. हेडगेवार हे स्वतः काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांनी १९२१ च्या असहकार आंदोलनात भाग घेतला होता. त्यांचा पिंडच क्रांतिकारी होता. पण केवळ ब्रिटिशांविरुद्ध लढणे पुरेसे नाही, तर हिंदू समाजाच्या संघटनाशक्तीला जागृत करणे हेच दीर्घकालीन स्वातंत्र्याची ग्वाही देऊ शकते, हे त्यांनी ओळखले आणि संघस्थापनेच्या मार्गावर ते वळले.

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात संघाने थेट सहभाग घेतला नाही, हे विरोधक सतत ओरडून सांगतात. पण वास्तविक पाहता, काँग्रेसमध्येच या आंदोलनावर एकमत नव्हते. खुद्द महात्मा गांधींनी करा किंवा मरा असे आवाहन केले, पण तत्कालीन काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी या आंदोलनाला संमिश्र प्रतिसाद दिला होता. अशा परिस्थितीत संघाने आपले स्वतंत्र मार्ग आखले आणि भारतासाठी दीर्घकालीन राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेकडे लक्ष केंद्रित केले. राष्ट्रासाठी समर्पित नेतत्व, संस्कारक्षम आणि राष्ट्रीय विचाराने प्रेरित युवकांची फौज तयार करणे हे संघाने त्या काळात केले, जे आजही देशासाठी अमूल्य ठरते आहे.

ब्रिटिश गुप्तचर अहवालांमध्येही संघाच्या राष्ट्रवादी कार्याकडे संशयित नजरेने पाहिले गेले होते. उदाहरणार्थ, १९३३ मध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांनी अहवालात लिहिले होते की, ''हे एक कठोर शिस्तबद्ध संघटन असून, भारतीय युवकांमध्ये राष्ट्रवाद जागृत करण्याचे कार्य करत आहे.'' (संदर्भ : ब्रिटिश इंटेलिजन्स रिपोर्ट, १९३३). जर संघ हा निष्क्रिय असता, तर ब्रिटिश सरकारने त्याच्या हालचालींवर एवढी बारीक नजर ठेवली असती का? स्वातंत्र्यानंतर १९४७ च्या विभाजनाच्या काळात पाकिस्तानातून स्थलांतरित होणाऱ्या लाखो निर्वासितांसाठी संघाच्या स्वयंसेवकांनी जिवाची बाजी लावली. दिल्लीतील किंग्सवे कॅम्पमध्ये स्वयंसेवकांनी हजारो निर्वासितांना अन्न, वस्त्र आणि सुरक्षितता पुरवली होती. हे त्या लोकांनी का विसरावे, जे आज संघावर खोटे आरोप करत सुटले आहेत? संघाच्या स्वातंत्र्यलढ्यातील भूमिकेवर शंका उपस्थित करणाऱ्यांनी स्वातंत्र्यलढा म्हणजे केवळ आंदोलन हा संकुचित दृष्टिकोन सोडून, व्यापक इतिहासाचा अभ्यास करावा. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा केवळ एक संस्था नाही, तर राष्ट्रप्रेम, समर्पण आणि सशक्त भारताच्या उभारणीसाठी प्रेरित असलेली एक चळवळ आहे. विरोधक कितीही नाकारत असले, तरी सत्याचा प्रकाशाला कोणीही कधीही झाकाळू शकणार नाही!

**प्रा. भागवत भांगे**/७२७६४६९८००

### नर्मदा परिक्रमेची संकल्पपूर्ती

जवळपास १०-१२ वर्षांपूर्वी मी जगन्नाथ कुंटेचे 'नर्मदे हर' हे पुस्तक वाचले होते. तेव्हापासून आपण ही नर्मदा-परिक्रमा करावी अशी प्रबळ इच्छा मनात येऊन गेली. पण तेव्हा सांसारिक जबाबदाऱ्या, माझी शाळा यामुळे ते शक्य नव्हते. तर असा हा नर्मदा- परिक्रमेचा आमचा योग २० फेब्रुवारी २०२५ ला जुळून आला. आमचा ओंकारेश्वरचा प्रवास सुरू झाला. नर्मदा म्हणजे सगळ्यांना आनंद देणारी नदी असा आमचा नर्मदेचा प्रवास सुरू झाला!! ओंकारेश्वरला पोचल्यावर आम्ही सगळेच खूप थकलो होतो. थोडा आराम झाल्यावर आम्ही ममलेश्वरच्या दर्शना साठी निघालो. हे भगवान शंकराच्या १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. दुसऱ्या दिवशी पहाटेच सगळ्यांनी नदीत अंघोळी आटोपल्या व नर्मदेचे जल आपल्या बाटलीत भरून नर्मदा- परिक्रमेचा विधीपूर्वक संकल्प करण्यात आला. नर्मदेची ओटी भरून, कन्यापूजन करण्यात आले. जवळपास ३५०० किमीचा प्रवास आम्हाला करायचा होता. नर्मदेचे जल नेहमी आपल्या सोबतच ठेवायचे व प्रत्येक ठिकाणी थोडे थोडे जल त्यात टाकत जायचे. आमचा मुक्काम महाराष्ट्र-गुजरातच्या बॉर्डरवर असलेले शहादा या गावी होता. हे छोटेसेच गाव नंदुरबार जिल्ह्यात आहे. सकाळच्या प्रसन्न वातावरणात आम्ही पूजन आटोपून ऋण मुक्तेश्वर, केदारेश्वर, काशी- विश्वेश्वर आदी मंदिरांचे दर्शन घेतले. इथे नर्मदा समुद्राला येऊन मिळते व गुजरातच्या खंबाट खाडीत येऊन समर्पित होते. रात्री २.३० च्या दरम्यान आम्ही दाहेजला आमच्या बसमध्ये बसलो. सकाळी ६ वाजता आम्ही नारेश्वर ला येऊन पोहचलो.

आता आमचा प्रवास प्रत्यक्ष वासदेवानंद सरस्वती



म्हणजेच टेंबे स्वामींची समाधी आहे, त्या गरुडेश्वरकडे होता. भारतभर भ्रमण करून टेंबे स्वामींनी शेवटचा चातुर्मास इथे केला होता. त्यानंतर बराच प्रवास केल्यानंतर महेश्वरपासून ४० किमीवर सहस्रधारा व एकमुखी दत्त- मंदिर आहे, ते बघायला आम्ही संध्याकाळी गेलो. शिवरात्रीची सुट्टी असल्याने गर्दी चांगलीच होती, त्यामुळे बसमधून उतरुन आम्हाला पायी जावे लागले. प्रत्येकाला आपले सुख- दुःख विसरायला लावणारी हीच ती नर्मदा आहे का? असे क्षणभर वाटून जाते! आता आमचा प्रवास नर्मदेचे नाभी- स्थान असलेले नेमावर या ठिकाणी होता. दुपारी ४ वाजता इथे पोचल्यावर आम्ही संध्याकाळी नदीवर जाऊन सिद्धेश्वर महादेव मंदिर, नर्मदा मंदिर पाहून आलो. अतिशय पुरातन अशा या मंदिरात ब्रह्मा - विष्णू- महेश यांच्या कोरीव काम केलेल्या वेगवेगळ्या मूर्ती आहेत. ३५० किमीपेक्षा जास्त अंतर पार करून रात्री ८ वाजता आम्ही भेडाघाटला येऊन पोहोचला.

आता आमचा प्रवास परतीच्या दिशेने सुरू झाला होता. अमरकंटकला उत्तर तट ओलांडून आम्ही परत दक्षिण तटावर जाणार होतो. दुसऱ्या दिवशी आमचा मुक्काम महाराजपूर (मंडला) इथे होता. या ठिकाणी सरस्वती - नर्मदा व कावेरी या तीन नद्यांचा संगम आहे. सकाळी आम्ही नदीवर जाऊन अंघोळी करून सूर्याला अर्घ्य अर्पण करून आलो. सकाळी आम्ही नर्मदापुरमकडे प्रस्थान केले म्हणजेच आधीचे हुशंगाबाद. ट्रीपचे आयोजक रोज आम्हाला वेगवेगळा नाश्ता व जेवण देऊन खूष करीत होते. परिक्रमेची संकल्पपूर्ती करण्यासाठी परत ओंकारेश्वरला येऊन पोहोचलो होतो. सकाळी कन्या पूजन, नर्मदेची ओटी व ममलेश्वराला अर्धे जल अर्पण करून आमचा नर्मदा परिक्रमेचा संकल्प पूर्ण केला.

**मीनाक्षी चावजी**/९९६०९९५८९३

### बदलती जीवनशैली, फास्टफूड आणि कॅन्सर

मेडिकल जर्नल ऑफ ऑन्कॉलॉजीने सांगितल्याप्रमाणे गेल्या १० वर्षामध्ये कॅन्सरचे प्रमाण २५ टक्क्यांनी वाढले आहे. यामध्ये ४० टक्के प्रकरणांमध्ये कॅन्सरचा संबंध तंबाखू सेवनाशी असल्याचं अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था म्हणजेच एम्समधल्या सर्जिकल ऑन्कॉलॉजी विभागाचे प्राध्यापक डॉ. एस. व्ही. एस. देव सांगतात. इतर ६० टक्के प्रकरणांमध्ये कॅन्सरची कारणे ही बहुविध आहेत.

जगभरात सर्वांत जास्त कॅन्सर अनुक्रमे फुफ्फुस, कोलन, पोट, यकृत, स्तन, अन्ननलिका असा आहे. जागतिक आरोग्य संघटनेने सांगितल्याप्रमाणे भारत देश कॅन्सरची जागतिक राजधानी होत आहे. भारतीयांची जीवनशैली आणि खानपान कॅन्सर वाढण्यास मदत करत आहेत. हरितक्रांतीनंतर भारतामध्ये रासायनिक खतांचा वापर जास्त वाढला. तणनाशके, कीटकनाशके जास्त वापरल्याने त्याविरोधात प्रतिरोध निर्माण झाला. त्यामुळे दिवसेंदिवस जास्त तीव्रतेचे रसायने शेतीसाठी वापरली जाऊ लागली. सकाळी उठल्यानंतर दात स्वच्छ करायच्या पेस्टपासून ते रात्री झोपेपर्यंत विविध पदार्थांमधून केमिकल्स शरीरामध्ये जात आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये दूध भेसळ प्रकरणे जास्त निदर्शनास आली. दूध जास्त काळ टिकण्यासाठी व घट्ट राहण्यासाठी त्यामध्ये युरिया खत टाकले जात होते. कोरोनानंतर वर्क फ्रॉम होम, बैठे जॉब जास्त वाढल्याने शारीरिक हालचाल कमी झाली आहे. त्यामुळे सुद्धा लठ्ठपणा वाढून कॅन्सर होण्यास अनुकूलता निर्माण होत आहे. कॅन्सर पूर्णतः हद्दपार करणे खूप अवघड आहे परंतु खालील काही उपाय कॅन्सरला दूर ठेवण्यास आपली मदत नक्कीच करू शकतात. रासायनिक खते वापरलेल्या भाज्या खाण्यापेक्षा किचन गार्डन ही पद्धत लोकांनी अमलात आणली पाहिजे. आपल्या घराच्या समोर अंगणामध्ये किंवा छतावर आपल्या परिवाराला जेवढी भाजी लागते तेवढी सेंद्रिय पद्धतीने लागवड केली पाहिजे. आपल्या जवळच्या शेतकऱ्यांना सेंद्रिय भाजीबद्दल सांगितले पाहिजे. तसेच जे शेतकरी सेंद्रिय शेती करतात त्यांच्याकडून खरेदी करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. पॅक फूड खाणे टाळले पाहिजे. दात घासण्यासाठी आयुर्वेदिक पद्धतीने तयार केलेले चूर्ण आपण वापरू शकतो. फ्रीजमध्ये जास्त काळ पदार्थ ठेवणे हे घातक आहे. त्यामुळे फ्रीजचा वापर कमीत कमी करावा. बंद बाटलीतील शीतपेये पिणे टाळू शकतो. गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरू शकतो. त्यामुळे प्रदूषित हवा नाकातोंडात कमी प्रमाणात जाते. शक्यतो कोठेही प्रवसाला जाताना पिण्याच्या पाण्याची बाटली सोबत घेऊन जाणे फायदेशीर राहते. त्यामुळे विकत मिळणारे बंद बाटलीमधील पाणी टाळता येऊ शकते. दररोजच्या जेवणामध्ये मैदा, सोडा, साखर या पदार्थांचा वापर कमी करावा. मैद्याचे पदार्थ जास्त काळ पोटाच्या आतड्यांमध्ये साठून राहतात. त्यामुळे सकाळी लवकर पोट साफ न झाल्याने पोटाच्या तक्रारी वाढतात. साखर तयार करताना त्यावर चमक यावी म्हणून विविध केमिलकचा वापर केला जातो. त्यामुळे दररोज जास्त प्रमाणात साखर खाणे हे आरोग्यास घातक ठरते. चहाबरोबर दररोज बिस्किटे, ब्रेड खाणे टाळावे. चायनीज, पिझ्झा, बर्गर यामध्ये मैद्याचे प्रमाण जास्त असते. असे पदार्थ टाळावेत. वरील विविध पद्धतींचा अवलंब करून आपण कॅन्सरला दूर ठेवू शकतो.

**अभिषेक गवळी**/७२४९७७३६९४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# भूमाफिया व खंडणीखोरांवर कठोर कारवाई केली जाईल-आयुष नोपाणी

## जालना क्रेडाई आयोजित बांधकाम व्यावसायिकांशी संवाद परिसंवादात स्पष्ट भूमिका

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भूमाफिया, खंडणीखोर आणि जमिनीवर बेकायदेशीर ताबा घेणाऱ्या प्रवृत्तीवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांनी येथे बोलताना दिला.

जालना क्रेडाईच्यावतीने शनिवार दि. ५ एप्रिल रोजी आयोजित बांधकाम व्यावसायिकांशी संवाद या परिसंवादात ते बोलत होते. ते म्हणाले की, क्रेडाई ही बांधकाम व्यवसायिकांची देशातील अग्रगण्य अशी व्यावसायिक संघटना आहे. काम करत असताना आपण कायदेशीर बाबीची पूर्तता करून व उत्कृष्ट असे बांधकाम करून सर्वसामान्यांचे स्वप्न आपण साकार करतात. अन्न, वस्त्र व निवारा या



मानवाच्या मुलभूत गरजापैकी निवारा आपण उपलब्ध करून देतात व सोबत मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देतात. हे करत असताना आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी काही प्रवृत्ती समाजामध्ये टपून बसलेले असतात आणि म्हणून अशा व्यक्तींचा कायदेशीर मार्गाने आपण या ठिकाणी बंदोबस्त करू शकतो. बांधकाम व्यवसायिकांनी कायदेशीर बाबीची पूर्तता करून मगच आपले काम सुरू करावे कामांमध्ये गुणवत्ता दर्जा हा चांगला ठेवल्यास निश्चितच आपला व्यवसाय वृद्धिंगत होईल. पोलीस प्रशासन आपल्या दारी' हा उपक्रम जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात राबवला जात असल्याची माहिती त्यांनी दिली. शाळांमधून मुलींना स्व-संरक्षणाचे धडे दिले जात आहेत, हेही त्यांनी नमूद केले. समाजामधील अपप्रवृत्तींना वेळीच आळा घालण्यासाठी आपण संघटितपणे काम करू शकतो. त्यामुळे संघटनेच्या माध्यमातून तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. या संवाद कार्यक्रमाचे अध्यक्ष अभय कुलकर्णी म्हणाले की, जेव्हा जेव्हा क्रेडाई जालना सदस्यांच्या समस्या घेऊन नोपाणी साहेबांकडे गेलो, तेव्हा त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून तत्काळ उपाययोजना केल्या. पोलिस खातं आमच्या पाठीशी आहे याचा आम्हाला विश्वास वाटतो. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश भोसले यांनी केले. सूत्रसंचालन चेतन मराठे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. विठ्ठल पवार यांनी केले.

# मंठ्यात आयपीएल क्रिकेटवर सट्टा सुरु; बुक्की चालकाची चांदी

## मंठ्याच्या सट्टयाच्या परभणी जिल्ह्यातील सेलू मुळ्या; मंठ्यात तर सत्ताधारी पक्षातील तालुकाप्रमुखाचे सट्ट्याने हात काळे

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

शहराच्या वेगवेगळ्या भागात सुरु असलेल्या आयपीएल क्रिकेट सामन्यावर शहरात मोठ्या प्रमाणावर सट्टा सुरु आहे .असल्याची माहिती आहे. या प्रकरणात वरिष्ठ पोलिस अधिकार्यांनी सूचना दिल्या असल्या तरीही आपापल्या सोयीप्रमाणे मोबाईलद्वारे सायंकाळच्या वेळी सट्टा घेतला जातो. या सत्तेच्या माध्यमातून दररोज करोडोची उलाढाल होत असून यामुळे तरुणाई वेगळीच व्यसन लागले असून हाताशी होऊन निराशाकडे जात आहे.

मागील महिन्यापासून आयपीएल क्रिकेट सामना सुरू झाला आहे.या सामन्यात दररोज होणाऱ्या क्रिकेट सामन्यात अंदाजित स्कोअर, हार-जीत यावर कमी पैशात जास्त पैशांचे आमिष दाखवून मोबाईलच्या माध्यमातून सट्टा सुरू आहे. याप्रकरणी आजपर्यंत एक सुद्धा कार्यवाही मंठा शहरांमध्ये झालेली दिसून येत नाही. शहरातील सत्ताधारी पक्षातील तालुकाप्रमुख यांचा या धंद्यामध्ये भागीदारी असल्याची चर्चा सुरू आहे. याचबरोबर मंठ्यातील सत्याच्या मुळे ह्या सेलूमध्ये दिसत आहेत. या सत्यातून करोडोची उलाढाल होत आहे. सट्टा लावण्यासाठी तरुण व नागरिक मिळेल तिथून पैसे आणतात व सट्टा लावतात. तर काही तरुण आई-वडिलांचे पैसे चोरून आणतात तर काही तरुण सोने नाणे विकुण सट्टा लावतात.तर काहीजण आपल्या पत्नीच्या अंगावरील डाग दागिने एकूण सट्टा लावतात. आयपीएलच्या या सट्टयापायी शेकडो करून कंगाल झाले असून निराशाकडे वळाले आहेत. लवकरच या बुक्की चालकावर कार्यवाही व्हावी. अशी मागणी माता-भगिनीसह ज्येष्ठ नागरिकांतून होत आहे. पूर्वी क्रिकेट सामन्यांवर सट्टा हा शहरापुरता मर्यादित होता. परंतु त्याचे लोण आता ग्रामीण भागातही पोहोचले आहे. वेगवेगळे कोडवर्ड वापरुन सुरु असलेल्या सट्टा रॅकेटची माहिती स्थानिक पोलिसांना नसावी ही गोष्ट न पटणारी आहे.

मागील आठवड्यात अर्थसंकल्पीय अधिवेशनात माजी मंत्री तथा विद्यमान आमदार अर्जुन खोतकर यांनी वेगवेगळ्या भागात पोलिसांच्या मदतीने सुरु असलेल्या सट्ट्याच्या व्यवहाराबाबत लक्ष वेधले होते. पोलिसांची कारवाई टाळण्यासाठी सट्टा चालकांनी नवीन मोबाईल अॅप तयार केले आहे. त्यावर वेगवेगळे कोडवर्ड वापरून हा व्यवहार होतो. पैसा लावल्यानंतर संबंधित व्यक्तीला ठरलेल्या दिवसानंतर रक्कम दिल्या जाते.

## संक्षिप्त

### श्रीराम नवमी निमित्त महाआरती संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा शहरात श्रीराम नवमी निमित्त ब्राह्मण गल्ली व सरस्वती नगरीतील श्रीराम मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नगराध्यक्ष तथा बाजार समिती संचालक वैजनाथ नाना बोराडे यांच्या हस्ते प्रभू श्रीराम रायाच्या मूर्तीचा अभिषेक व महाआरती पार पडली. यावेळी मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती होती.

### कृती समितीच्या जिल्हाध्यक्षपदी सदानंद लोखंडे यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

कोल्हापूर येथे महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या राज्य कार्यकारिणीची बैठक दि.६ एप्रिल रोजी पार पडली. यामध्ये राज्यातील पदाधिकाऱ्यांची खांदेपालट व नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे हे होते.या बैठकीमध्ये जालना जिल्हाध्यक्षपदी जाफ्राबाद येथील अंशतःअनुदानित शिक्षक सदानंद लोखंडे यांची निवड करण्यात आली आहे त्यांना दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की,जालना जिल्ह्यातील अंशतः अनुदानित प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे प्रश्न, समस्या व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला आपण जिल्हा व राज्यस्तरावर वाचा फोडून त्यांना वेळोवेळी सहकार्य करावे तसेच संघटनेच्या माध्यमातून वेळोवेळी होणाऱ्या आंदोलनात आपण स्वतः सहभागी होऊन जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शिक्षक बांधवांना संघटित करावे. असे पत्रात म्हटले आहे.

त्यांच्या निवडीबद्दल खंडेराव जगदाळे, के पी पाटील, ज्ञानेश चव्हाण, गजानन खैरे, यादव शेळके, संजय डावरे, शाहीर राजू भोरे,प्रमोद पाटील, मुक्ताताई आर्दाड, शंकर शेरे, गजानन मिरगे,प्रा. रमेश शेळके, प्रा. विलास नवले आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### कदीम जालना पोलिसांनी नराधमाच्या आवळल्या मुसक्या

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जुना जालना भागात एका वर्षाच्या चिमुकल्या मुलीवर तिच्या आईच्याच प्रियकराने लैंगिक अत्याचाराबरोबरच अनैसर्गिक कृत्ये केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. आरोपी नराधमाच्या कदीम जालना पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत.

परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील एक २८ वर्षीय महिला पतीपासून विभक्त झालेली असून, ती जुना जालना भागात खोली किरायाने घेऊन राहत आहे. तिला पहिल्या पतीपासून तीन मुली व एक मुलगा झालेला असून, त्यापैकी एक मुलगा व एक मुलगी पतिकडे जिंतूर येथे राहतात. तर एक ६ व दुसरी ४ वर्षाची मुलगी त्या महिलेकडे राहत आहे.सदर महिला साफसफाई आणि घरगुती काम करून तिचा व मुलींचा उदरनिर्वाह भागवते. अशाच दोन वर्षांपूर्वी तिची एका हॉटेलमध्ये मॅनेजर म्हणून काम करणार्या प्रशांत प्रकाश वाडेकर याच्याशी ओळख झाली होती. तेंव्हापासून ती महिला आणि वाडेकर हे दोघे दोन वर्षांपासून किरायाच्या खोलीमध्ये एकत्रच लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते.

# जगातील सर्वात मोठ्या पक्षाचे आपण सर्वजण सदस्य याचा अभिमान -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी हा जगातील सर्वात मोठा पक्ष असून, ६ एप्रिल १९८० साली अटलजी अडवाणी जी यांनी लावलेल्या येवल्याच्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाल्याचा आनंद असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले.



ते परतुर येथे भाजपा स्थापना दिनानिमित्त आयोजित, पक्ष पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शक्ती केंद्रप्रमुख बूथ प्रमुख यांना संबोधित करताना बोलत होते. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, भारतीय जनता पार्टीचा मी पक्ष स्थापनेपासून चा सदस्य असून, पक्ष स्थापनेचे आपण साक्षीदार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, अटल बिहारी वाजपेयी अडवाणी यांच्यासह महाराष्ट्र राज्यांमध्ये प्रमोद जी महाजन असतील गोपीनाथराव मुंडे असतील यांच्या नेतृत्वामुळे पक्ष वाढीला गती मिळाली आणि पक्षाची पाळीमुळे राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचली, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने प्रचंड झेप घेतलेली असून, पक्षाचे वैभव टिकवून ठेवण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी पदाधिकाऱ्याने अविरत काम करण्याचे आवाहन यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थितांना केले. पुढे ते म्हणाले की, गेल्या ४५ वर्षापासून पक्षाचा कार्यकर्ता म्हणून काम करीत असताना अनेकांनी खांद्याला खांदा लावून काम करत पक्ष वाढीसाठी माझ्या समवेत काम केल्यानेच परतूर विधानसभा मतदारसंघांमध्ये पक्षाची सर्वत्र एक हाती सत्ता असल्याचे चित्र आहे असेही ते या वेळी बोलताना म्हणाले यावेळी परतूर मंठा विधानसभा मतदारसंघांमध्ये हजार पाचशे तीनशे अशी सदस्य नोंदणी करणाऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांचा सत्कार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आला. दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, यांनी राज्यभरातील पक्ष पदाधिकाऱ्यांनी ०१ कोटी ५० लक्ष सदस्य नोंदणी करून महाराष्ट्राला आघाडीवर ठेवण्याचा आनंद असल्याचे यावेळी बोलताना सांगितले. भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर गणेशराव खवणे सतीशराव निर्वळ, शत्रुघ्न कणसे पंजाब बोराडे रमेश भापकर संपत टकले, विलास घोडके, प्रदीप ढवळे दिगंबर मुजमुले पद्माकर कवडे संभाजी वारे सुदाम प्रधान, माणिकराव वाघमारे तुकाराम सोळंके, अमोल , पवार नागेश ढवळे, प्रवीण सातोनकर , संदीप बाहेकर, प्रकाश चव्हाण कृष्णा आरगडे, सोनू अग्रवाल ज्ञानेश्वर जईद राजेभाऊ खराबे नागेश घारे माऊली गोंडगे रमेश वायाळ आनंद जाधव, रावसाहेब ढवळे अमोल मोरे भगवान कांबळे शरद देशमुख गजानन लिपणे श्रीराम जाधव आदित्य केंदळे पांडुरंग चव्हाण अमरसिंग राठोड वैभव नरवडे, पांडुरंग चव्हाण, बालाजी सांगोळे दीपक पुरी, एकनाथ थोटे, संदीप तनपुरे, राहुल काळे विष्णु शहाणे, बबलू सातपुते बाबाराव थोरात, मलिक कुरेशी रामजी कोरडे कृष्णा भदर्गे, हनुमान चिखले, सूर्यभान कदम गणेश सोळंके रमेश थोरात छत्रपती थोरात यांच्यासह मोठ्या संख्येने पक्ष पदाधिकारी लोकप्रतिनिधी बोट प्रमुख शक्ती केंद्रप्रमुख यांची उपस्थिती होती

# सांघिक खेळांमुळे जातीय सलोखा टिकून राहतो -रावसाहेब दानवे

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

शालेय जीवनापासून प्रत्येकाला शिक्षणाबरोबर खेळाची ही आवड असली पाहिजे. सध्या सर्वांना क्रिकेटचे वेड जास्त आहे. परतु आपणभारतीय खेळ ही खेळले पाहीजे. खेळांमुळेच सामाजिक व जातीय सलोखा टिकून राहतो, असे प्रतिपादन माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब पा. दानवे यांनी केले. भोकरदन येथील जुने तहसील कार्यालय मैदानावर आयोजित जालना प्रिमीअर लिग हॉलीबॉल स्पर्धेच उदघाटन शनिवारी (दि.५) श्री. दानवे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत दराडे, पोलीस निरीक्षक किरण बिडवे, माजी नगराध्यक्ष हर्षकुमार जाधव, मुकेश चिने, रमेश मुरकुटे आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना माजी केंद्रीयमंत्री दानवे यांनी खेळांमुळे आरोग्यही चांगले राहते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासून खेळाला महत्त्व द्यावे, असा सल्ला त्यांनी दिला, या हॉलीबॉल स्पर्धेत तालुक्यातील अनेक संघांनी सहभाग घेतलेला आहे. यामध्ये मुलींच्या संघांची संख्या अधिक आहे. या लीगमध्ये संघ मालकांच्या माध्यमातून खेळाडू मैदानात उतरले आहेत. विजेत्या संघाना प्रथम, द्वितीय व तृतीय अशी रोख पारितोषिके दिली जाणार आहेत. दरम्यान, या हॉलीबॉल लीग स्पर्धेमुळे भोकरदन शहरातील वातावरण क्रीडामय बनले आहे



## टेंभुर्णी ते राजुर फाट्यावरील हायवे रोडवरील खड्ड्यांमुळे अनेकांना दुखापत

### सा.बां.विभागाचे दुर्लक्ष!



**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी/प्रतिनिधी**

जालना जाफाराबाद हायवे रोडवरील खड्याने अनेकांना दुखापत करून वाहन चालवताना करावी लागते कसरत.

जाफाराबाद सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असून, याकडे तात्काळ लक्ष वेधून खड्डे बुजविण्याची मागणी. जाफाराबाद तालुक्यातील टेंभुर्णी पासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या राजुर फाट्याजवळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कक्षेत असलेल्या हायवे रोडवरील खड्डे व पुलाच्या मध्ये भागी पडलेल्या जागोजागी भगदाड पडले असल्याने रोज अनेक दुचाकीवरून जाणाऱ्या वाहन चालकांना या खराब झालेल्या रस्ताचा अंदाज येत नसल्याने दिवसभरात लहान मोठे अपघात होऊन अनेकांना दुखापतीला सामोरे जावे लागत आहे. तर काहीना कायमचे अपंगत्व आलं आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांना माहिती देऊन सुध्दा याकडे कानाडोळा केल्या जात असल्याने याकडे आ. संतोष दानवे यांनी लक्ष देऊन या रोडवरील पडलेल्या खड्ड्यात डांबर टाकून मजबूत करण्यासाठी संबंधित अधिकारी यांना सुचना कराव्यात अशी मागणी प्रवाशांनी केली आहे. तसेच आकोला देव व शिराळ नाला जवळील पुलाच्या मध्ये भागी भगदाड पडल्याने वाहन धारकांना वाहन चालवतांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. याठिकाणी अनेकदा आपघात होत असुन , दुचाकीवर पाठी मागे बसलेल्या महिलांना पडुन काही अपंगत्व आले तर काहीना जबर मार लागलेल्या घटना घडल्या आहेत.

→ *टेंभुर्णी ते जालना हायवेवर रोडवरील खड्डे बुजविण्याची सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने लक्ष वेधून होणाऱ्या आपघात दुखापत पासून प्रवाशांना दिलासा द्यावा.अनेक वेळा सा बा विभागाचे अधिकारी यांना तक्रार दिली परंतु दुर्लक्ष होत आहे शिवाय रोडच्या लगतचे शेतकऱ्यां मुद्दाम खड्डे करून नागरिकांना त्रास देत आहे याकडे लक्ष केंद्रित करून कार्यावाही करावी.* ***-चेअरमन - रावसाहेब अंभोरे***

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यास जगात तोड नाही -आमदार अर्जुनराव खोतकर

## सत्कार सोहळा : आनंद नगर येथे भीम गीतांची मैफिल

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

तथागत भगवान गौतम बुद्धांनी दिलेले पंचशील हे मानवतेचे अखंड प्रेरणास्त्रोत असून आपण भरकटतो तेव्हा पंचशीलांचे स्मरण केले तर मनातील वाईट विचार निघून जातात महामानव , भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून सर्वांना एक समान केले असून प्रत्येकाने संविधानाचे वाचन, मनन केले पाहिजे,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यास जगात तोड नाही. असे प्रतिपादन आ. अर्जुनराव खोतकर यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आनंदनगर-आदर्श नगर उत्सव समिती, नागवंश मित्र मंडळ, आणि निखिल पगारे मित्र मंडळाच्या वतीने शुक्रवारी (ता .०४) आ. अर्जुनराव खोतकर यांचा सत्कार आणि महागायिका कोमल पाटोळे मेंढापुरकर यांच्या भीम गीत मैफिलीचा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी आ. खोतकर बोलत होते. उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर,डॉ.प्रदीप हुसे, डॉ. प्रल्हाद धारूडकर, ज्येष्ठ नेते सुदामराव सदाशिवे, सोनाजी नावकर, अशोक नावकर,सुनील साळवे, नंदकिशोर जांगडे, निखिल पगारे,विशाल बनकर,सतीश जाधव, शशिकांत घुगे,संदीप खरात, श्रीकांत पांगारकर,किशोर पांगारकर,संतोष मोहिते, गणेश सुपारकर,बाला परदेशी, दिनकर घेवंदे, दीपक डोके,रमेश यज्ञेकर, भोला कांबळे, ड.कल्पना त्रिभुवन, ड. अशफाक पठाण, आदींची उपस्थिती होती.



आ.अर्जुनराव खोतकर म्हणाले, निखिल पगारे यांनी या भागात विकास कामे केली असून जनतेने त्यांना अशीच खंबीर साथ द्यावी, आपण योग्य स्थान देऊ असे संकेत आ. खोतकर यांनी दिले. निखिल पगारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आणि मंगल परिणय दिनाचे औचित्य साधून प्रबोधनात्मक गीतांची मैफिल आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले. सुत्रसंचालन संदीप साबळे ,माधुरी मोरे यांनी केले. गायिका कोमल पाटोळे मेंढापुरकर यांच्या संचाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई यांच्या जीवन, संघर्षावर आधारित बहारदार गीतांचे सादरीकरण केले. यावेळी शरद डोळसे, भास्कर रत्नपारखे, सदानंद टवले, अर्जुन जाधव, भास्कर घेवंदे, भागवत राऊत,यांच्या सह महिला, नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

तरुण भारत
कृषीभारत





# कांद्यावर करा 'ही' प्रक्रिया

**महाराष्ट्रामध्ये कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. विशेषता नाशिक जिल्ह्यात कांदा लागवड मोठ्या प्रमाणात होते. कांदा पिकाचे सगळ्यात मोठी कमजोरी असेल तर ती म्हणजे कांद्याच्या बाबतीत कायम असलेली भावाची अनियमितता. एवढेच नाही तर कांदा ही वस्तू नाशवंत असल्यामुळे त्याची जास्त काळ साठवणूक करणे देखील शक्य होत नाही. त्यामुळे शेतकरी मिळेल त्या भावाने कांदा विक्री करणे पसंत करतात. परंतु यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड प्रमाणात आर्थिक फटका बसतो. परंतु जर कांद्याच्या बाबतीत थोडा हटके विचार केला आणि कांदावर प्रक्रिया करून त्यांचा कार्यकाळ जर वाढवला तर नक्कीच त्याचे बाजारमूल्य वाढेल व जास्तीत जास्त नफा मिळवता येईल.**

प्रक्रिया उद्योग

### कांद्यावर करा डिहायड्रेशन प्रक्रिया-

डीहायड्रेशन हा शब्द आपल्याला सगळ्यांना माहिती आहे. जर आपण या शब्दाचा मराठीमध्ये अर्थ पाहिला तर तो होतो वाळवणे, याचा अर्थ कांद्याचे डीहायड्रेशन म्हणजे कांद्याला वाळवणे हे सरळ सरळ आपल्याला लक्षात येईल. परंतु कांद्याला वाळवावे कसे हा एक मोठा प्रश्न आहे. तर त्यासाठी कांद्याचे बारीक तुकडे करावे लागतात व त्यांना उन्हामध्ये किंवा डीहायड्रेशन यंत्राचा वापर करून कांदा वाळवला जातो. त्यानंतर कांद्याचे जे बारीक तुकडे वाळवले जातात ते तुकडे किंवा त्या



तुकड्यांची पावडर तयार करून बाजारात जर विकली तर नक्कीच खूप नफा मिळतो.

**कांद्याच्या डीहायड्रेशन प्रक्रियेत करावी लागणारी भांडवली गुंतवणूक-**

कांद्याचे डीहायड्रेशन प्रक्रियेसाठी जर तुम्हाला युनिट स्थापन करायचा असेल तर त्यासाठी तुम्हाला एक लाख पन्नास हजार ते पाच लाखांपर्यंत भांडवल गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

**लागणारा कच्चामाल-**

कांद्याच्या डीहायड्रेशन प्रक्रियेसाठी कांदा हाच मुख्य कच्चामाल असल्यामुळे हा प्रक्रिया उद्योग कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या परिसरात किंवा कांदा खरेदी विक्री केंद्र किंवा मार्केटच्या ठिकाणी आहेत, अशा ठिकाणी सुरू केला तर वाहतूक खर्च कमी होतो. जर तुम्हाला जास्तीत जास्त कांदा लागत असेल तर तुम्ही कांदा उत्पादक शेतकऱ्यांसोबत या संबंधीचा करार करू शकतात किंवा तालुका बाजार समितीतून जे शेतकरी कांदा विक्रीला असतात त्यांच्याकडून कांदा विकत घेऊ शकतात.

**या प्रक्रियेसाठी लागणारी यंत्रसामग्री-**

तुम्हाला अगदी छोट्या प्रमाणात हा व्यवसाय सुरू करायचा असेल तर तुम्हाला कांद्याचे तुकडे करण्यासाठी एक कटिंग मशीन, कांदा वाळवण्यासाठी ड्रायर मशीन तसेच वाळवलेल्या कांद्यापासून जर तुम्हाला पावडर तयार करायचे असेल तर ग्राइंडर मशीनची आवश्यकता भासते. तसेच तुम्ही जो काही माल तयार कराल त्याच्या पॅकिंग करण्यासाठी तुम्हाला पॅकेजिंग मशिनची देखील आवश्यकता भासते. या पॅकेजिंग मशिन मध्ये तुम्ही ऑटोमॅटिक मशीन चा वापर करून उत्पादन क्षमता वाढवू शकतात.

**या यंत्रसामग्रीची किंमत-**

सोलर ड्रायर घेण्यासाठी तुम्हाला ६५००० हजार रुपये पासून मिळू शकते तर ग्राइंडर मशीन साठी आठ हजार रुपये व पॅकेजिंग मशीन साठी एक हजार ५०० रुपये एवढा खर्च येतो. यासाठी लागणारे मनुष्यबळ हे जास्त नसून अवघ्या दोन किंवा पाच माणसांना घेऊन तुम्ही हा उद्योग सुरू करू शकतात.

**तयार मालाची विक्री कशी आणि कुठे कराल?**

तुम्ही कांद्यावर प्रक्रिया करून जो काही माल तयार कराल तो तुम्ही मसाले उत्पादक कंपन्यांना विकू शकतात. तसेच हॉटेल्समध्ये सुद्धा या उत्पादनांचा वापर दिवसेंदिवस वाढत असून बरीचशी हॉटेल्स आणि रेस्टोरन्टन्सला तुम्ही नियमितपणे तुमचा माल पुरवू शकतात. जे कंपन्या वेफर्स तयार करतात अशा कंपन्यांना कांदा पावडरची आवश्यकता भासते. अशा वेफर्स तयार करणाऱ्या कंपन्यांसोबत तुम्ही करार करू शकतात.



# भेंडी पिकाचे अन्नद्रव्य व्यवस्थापन



**महाराष्ट्रातील हवामान भेंडीच्या लागवडीस पोषक असून, पावसाळी आणि उन्हाळी हंगामात भेंडीची लागवड करता येते. उन्हाळी हंगामातील भेंडीची लागवड १५ जानेवारी ते फेब्रुवारी अखेर या कालावधीत पूर्ण झालेली असेल. मुळात भेंडी या पिकाला उष्ण आणि दमट हवामान चांगले मानवते. तसेच तापमान ४२ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक असल्यास फुलांची गळ होते. त्यामुळे भेंडी पिकाचे अधिक उत्पादक घेण्यासाठी भेंडीचे अन्नद्रव्य व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असते.**

**जमीन :** भेंडीसाठी कसदार किंवा पोयट्याची, चांगल्या निचऱ्याची, सामू ६ ते ७ दरम्यान असलेली जमीन योग्य मानली जाते. जमिनीत सेंद्रिय व जैविक खताचा वापर करावा.

**बियाणे व बीजप्रक्रिया :** हंगामानुसार प्रति हेक्टरी १०-१२ किलो बियाणे लागते. जिवाणू खतांचा वापर केल्यास पीक उत्पादनात ७ ते १० टक्के वाढ झाल्याचे आढळले आहे. बियाण्याला झोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळवणारे जिवाणू (पीएसबी) या संवर्धकांची प्रति किलो २५ ग्रॅम या प्रमाणे प्रक्रिया करावी. बियाणे सावलीत वाळवून त्वरित वापरावे. बीजप्रक्रिया करताना जैविक घटक बियाण्यावर हाताने जोरात चोळू नये. बियाण्याचे बाहेरील नाजूक आवरण निघून बियाण्याची उगवणक्षमता कमी होते. म्हणून बियाणे प्लॅस्टिक पिशवीवर किंवा गोणीवर पातळ थरामध्ये पसरावे. त्यावर संवर्धके टाकून प्लॅस्टिक पिशवी किंवा गोणी दोन व्यक्तींच्या साह्याने टोके धरून अलगद हलवावी. यामुळे संवर्धकाचा लेप बियाण्यावर एकसारखा चिकटण्यास मदत होते.

प्रक्रिया केल्यानंतर बियाणे २४ तासांच्या आत पेरावे. या प्रक्रियेमुळे नत्र व स्फुरदयुक्त खतांच्या मात्रेमध्ये सुमारे २५ ते ३० टक्के बचत होते. रासायनिक खत किंवा रासायनिक घटकांबरोबर जिवाणू संवर्धक मिसळू नयेत किंवा जैविक प्रक्रियेनंतर रासायनिक बीज प्रक्रिया करू नये.

**लागवड :** साधारणतः ३० ते ६० × १५ते ३० सें.मी. अंतरावर भेंडीची करता येते. उच्च प्रतिची गुणवत्ता आणि हिरव्या-कोवळ्या, लुसलुशीत भेंडी फळांची नियमित तोडणी करण्याच्या उद्देशाने लागवड ४०× १० किंवा ४५ × २० सेंमी अंतरावर करणे फायदेशीर दिसून आले आहे.

**वाण :** फुले उत्कर्षा, फुले विमुक्ता, गुजरात आनंद भेंडी ५, काशी लालिमा (लाल भेंडी), इ. जातीपरत्वे, जमिनीतील ओलावा, हंगाम इ. नुसार सर्वसाधारणपणे आठवड्याने बी उगवण्यास सुरुवात होते आणि १०-१२ दिवसांपर्यंत सर्व बिया उगवतात. ज्या ठिकाणी बी उगवले नसेल, त्या ठिकाणी राखून ठेवलेले त्याच वाणाचे बियाणे नांग्या भरण्यासाठी वापरावे. लगेच पाणी द्यावे. बियाणे उगविण्यासाठी संरक्षित पाणी व्यवस्थापन करणे गरजेचे असते.

**अन्नद्रव्य व्यवस्थापन :** पिकाच्या उत्पादकता वाढीसह जमिनीचे जैविक, भौतिक व रासायनिक गुणधर्म टिकविण्यासाठी माती परीक्षणानुसार सेंद्रिय, जिवाणू आणि रासायनिक खतांचा संतुलित वापर करावा. माती परीक्षणामध्ये उपलब्ध अन्नद्रव्ये (किलो/हे.) मध्यम प्रमाणात असल्यास शिफारशीत खतमात्रा द्यावी. त्यापेक्षा कमी किंवा अत्यंत कमी असल्यास शिफारशीपेक्षा अनुक्रमे २५ टक्के किंवा ५० टक्के अधिक खतमात्रा द्यावी. उपलब्ध अन्नद्रव्ये जास्त किंवा अत्यंत जास्त असल्यास शिफारशीपेक्षा अनुक्रमे २५ टक्के किंवा ५० टक्के कमी खतमात्रा द्यावी.

**सेंद्रिय कर्ब व्यवस्थापन-**

१) सेंद्रिय कर्ब जमिनीच्या भौतिक गुणधर्माशी निगडित असून, ते जमिनीचे गुणधर्म संतुलित ठेवते.

२) सेंद्रिय कर्बामुळे जमिनीत योग्य प्रमाणात हवा आणि पाणी यांची उपलब्धता वाढते. परिणामी जमिनीत जिवाणूंची संख्या व कार्यक्षमता वाढते. त्याद्वारे पिकांना अन्नद्रव्याची उपलब्धता केली जाते.

३) जमिनीचा पोत सुधारण्यासाठी सेंद्रिय खते, भरखते व जिवाणूखते वापरावीत. शेणखत, गांडूळ खत, कंपोस्ट खत या भरखतांचा आणि निंबोळी पेंड अशा जोरखताचा वापर करता येतो.

जमिनीत निसर्गतः असलेले अनेक प्रकारचे जिवाणू व क्टिनोमायसीट्स हे अद्राव्य स्वरूपात स्थिर झालेले स्फुरद विरघळून ते पिकांना उपलब्ध करून देण्याचे काम करतात. पिकासाठी जमिनीत उपयुक्त जिवाणूंचे प्रमाण वाढविण्यासाठी जिवाणू खतांचा वापर करावा. एकरी ट्रायकोडर्मा २.४ किलो, झोटोबॅक्टर १ किलो आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणू १ किलो या प्रमाणे सेंद्रिय खतात एक आठवडा मुरवून वापरावे. कोणतीही जैविक संवर्धने रासायनिक खते, कीडनाशक आणि बुरशीनाशकांबरोबर एकत्र देऊ नयेत. जैविक संवर्धने द्रव स्वरूपात असतील तर ठिबक सिंचनाद्वारे द्यावीत.



**तोडणी व उत्पादन-**

भेंडीचे उत्पादन जाती आणि संकर, लागवडीचे अंतर, जमीन व हवामान, पीक व्यवस्थापन इ घटकांवर अवलंबून असते. लागवडीपासून ४५ दिवसात भेंडीस फुले येण्यास सुरुवात होते. भेंडी पिकात जातीनुसार आणि पीक व्यवस्थापनानुसार साधारणतः १६ ते २० तोडण्या होतात. उन्हाळी हंगामात १५ ते २० टन प्रति हेक्टरी उत्पादन मिळू शकते.



# विद्राव्य खत वापरताना...

**पिकापासून भरघोस उत्पादन मिळावे यासाठी विविध प्रकारच्या रासायनिक खतांचा वापर केला जातो. हे दाणेदार खतांच्या बाबतीत ठरू शकते.परंतु पिकांना आवश्यक असलेल्या सूक्ष्म अन्नद्रव्यांचा पुरवठा हा विद्राव्य खतांच्या माध्यमातून केला जातो. विद्राव्य खते ही पाण्यात विरघळणारी असल्यामुळे ठिबकच्या माध्यमातून खताचा पुरवठा पिकांना केला जातो. परंतु विद्राव्य खतांचा वापर करताना काही गोष्टींची तंतोतंत काळजी घेणे खूप गरजेचे आहे. त्यामुळे आपल्याला अपेक्षित असलेले परिणाम आणि पिकांना होणारी पोषक घटकांची उपलब्धता व्यवस्थित होते. या दृष्टिकोनातून विद्राव्य खते देताना प्रामुख्याने कोणती काळजी घ्यावी? याबद्दलची माहिती जाणून घेऊ...**

**विद्राव्य खते देताना 'ही' काळजी घ्या-**

- सर्वात महत्त्वाचे म्हणजे जेव्हा आपण विद्राव्य खते पाण्यामध्ये मिसळतो तेव्हा ती एकसारख्या प्रमाणात मिळणे गरजेचे आहे. तेव्हाच ते सारख्या प्रमाणात पिकाला देणे शक्य आहे. विद्राव्य खते पाण्यात विरघळून त्यांचा गाळ होणार नाही, याची काळजी घ्यावी.
- सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे मिश्रण पाण्यामध्ये टाकावे. त्याउलट विद्राव्य खतांच्या मिश्रणात पाणी टाकू नये.
- तसेच ठिबक सिंचनाच्या माध्यमातून विद्राव्य खते देण्याच्या अगोदर ठिबक संचाचा जाळीचा फल्टर, मेन लाईन तसेच लॅटरल,फ्लश वोल्व, सॅण्ड फिल्टर इत्यादींमधून गळती तर होत नाही ना याची दक्षता घ्यावी.
- ठिबक चालू केल्यानंतर शेतातील सर्व ड्रीपरच्या ठिकाणी सारख्या प्रमाणात पाणी येते की नाही हे देखील बघणे गरजेचे आहे. काही ड्रीपरमधून व्यवस्थित पाणी येत नसेल तर त्यामध्ये असलेल्या चकत्या फिट कराव्यात.
- ठिबक संचाचे सॅण्ड फिल्टर व जाळीचे फिल्टर व्यवस्थित नियमितपणे स्वच्छ करणे गरजेचे आहे. त्यासोबतच लॅटरलची तोंडे आठ ते पंधरा दिवसांनी उघडून पाण्याचा दाब देऊन स्वच्छ करून घ्यावी.
- विद्राव्य खते देण्याअगोदर झाडांना पाण्याची किती गरज आहे हे त्या भागातील जमीन तसेच हवामान व पिकाची अवस्था इत्यादी गोष्टींचा अभ्यास करावा. पाणी देताना जमिनीत दररोज वाफसा स्थितीत राहील या बेताने पाणी द्यावे.
- ठिबकमधून खते द्यायची असल्यास दहा मिनिटांपेक्षा जास्त वेळ पाणी देऊ नये. कारण पाण्याबरोबर खतांचा निचरा होतो म्हणून पिकांना आवश्यक तेवढेच पाणी द्यावे.

८-१९:१९:१९ आणि १२:६१:00 कधी एक किलो खते विरघळण्यासाठी कमीत कमी १५ लिटर पाण्याची आवश्यकता असते व एक किलो 00:00:५0 विरघळण्यासाठी २0 लिटर पाणी वापरणे गरजेचे आहे.

- कॅल्शियम नायट्रेट व कॅल्शियम आणि बोरॉन मिश्रखत ही ड्रीप खते १३.00:४५ या खतांव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या खताबरोबर मिसळू नये.
- ह्युमिक ॲसिड व सी विड पावडरसारखी इतर पावडरयुक्त खते असतील तर ते पाण्यामध्ये मिसळताना ड्रममधील पाणी अगोदर गोलाकार चांगले ढवळून घ्यावे.
- समजा तुम्हाला ह्युमिक ॲसिड विरघळवायचे असेल तर पाण्याचे प्रमाण शंभर लिटर प्रति किलो साठी वापरावे. तसेच चिलेटेड मायक्रोन्यूट्रिएंट त्याच्या वापरानंतर त्यांचे पॅकेट सीलबंद करून ठेवावे.
- त्यासोबतच महत्त्वाचे म्हणजे कॅल्शियम, सल्फर व कॉपर युक्त खते कोणत्याही खताबरोबर मिसळू नयेत.
- फॉस्फरिक ॲसिड सोबत कोणतीही फवारणी किंवा ड्रीप खत एकत्र करू नये.
- नत्रयुक्त खते वातावरणातील आद्रता शोषून घेतात. त्यामुळे ही खते उघडी ठेवू नयेत.

# उन्हाळ्यात जनावरांना होणारा लू आजार

**उन्हाळ्यात बहुतांश जनावरांना लू आजाराची लागण होण्याची शक्यता असते. यामध्ये गुरे दगावल्याने शेतकरी संकटात सापडतो. सध्या तापमान वाढल्याने लू आजाराची ही शक्यता गृहित धरून पशुसंवर्धन विभागाकडून जनावरांसाठी उपचार पद्धती जाहीर करण्यात आली आहे. यामुळे पशुपालक व शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. उन्हाळ्यात जनावरांमध्ये लू आजाराची लक्षणे आढळत असतात. संकरित जनावरे उन्हाळ्यातील अति उष्णतेचा त्रास सहन करू शकत नाहीत. गाईपेक्षा म्हशींना उष्णतेचा त्रास जास्त होतो. जिल्हा पशुसंवर्धन विभागाकडून यावर उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.**

पशुधन



**उन्हाळ्यात गुरांची काळजी व खाद्य-**

उन्हाळ्यात गुरांना हिरवा चारा खाण्यास द्यावा, दिवसातून तीन-चार वेळा पाणी पिण्यास द्यावे, गुरांना पाण्यात मीठ आणि पीठ टाकून पिऊ घातल्यास ते फायदेशीर असते. उन्हाळ्यात हिरवा चाऱ्याची कमतरता असते. यामुळे पशुपालकांनी मूग, मका, कडवल आदी पिके लावावीत. यामुळे उन्हाळ्यात गुरांना हिरवा चारा उपलब्ध होईल. कार्बोहायड्रेट अधिक प्रमाण असलेले खाद्य द्यावे, गुरांच्या चाऱ्यात अमिनो पावर आणि ग्रो बी-प्लेक्स मिसळावे, उष्णता वाढल्याने गुरांच्या पचनशक्तीवर परिणाम होतो. त्यांची भूक कमी होत असते. अशावेळी जनावरांचा खुराक वाढविण्यासाठी गुरांना नियमितपणे ग्रोलिव फोर्ट दिले पाहिजे, वयस्कर गुरांना ५0 ते ६0 ग्रॅम इलेक्ट्रॉल एनर्जी आणि वासरांना १0 ते १५ ग्रॅम इलेक्ट्रॉल एनर्जी दररोज द्यावे.


**वेळीच उपचार महत्त्वाचे-**

मोकळी जागा राहील, हवा खेळती राहील, अशी शेड जनावरांसाठी असावी. कधी-कधी नाकातून रक्त आल्यास बर्फ किंवा गार पाण्याच्या पट्ट्या जनावरांच्या डोक्यावर बांधाव्यात.

गुरांना दररोज १ ते २ वेळा गार पाण्याने अंघोळ घालावी. इलेक्ट्रॉल एनर्जी द्यावी. जनावरांसाठी २४ तास स्वच्छ पाण्याची उपलब्धता असावी. उन्हापासून वाचण्यासाठी पशुपालन करणाऱ्यांनी शेडमध्ये पंखा, कुलर, किंवा फवारा सिस्टीम लावावी, गुरांना दिवसा शेडमध्ये बांधावे, लू आजाराची लागण झाल्यानंतर तत्काळ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना दाखवावे. तापमान वाढल्याने गुरांना त्रास होण्याची शक्यता आहे. लू आजाराबाबत पशुपालकांनी आवश्यक काळजी घ्यावी तसेच अधिक माहितीसाठी पशुवैद्यकिय तज्ज्ञांशी संपर्क साधावा.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



नांदेड- श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने आज शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या यात्रेत अनेक देखाव्यांनी भाविकांना आकर्षीत केले. या शोभायात्रेत जिल्हाभरातील लाखोंच्या संख्येने भाविकसहभागी झाले.

## संक्षिप्त वृत्त




### राम पहाट कार्यक्रमाने रसिक श्रोते मंत्रमुग्ध, दिग्गज कलावंतांनी सादर केली भक्तीगिते

**नांदेड**-कलांगण प्रतिष्ठाण, श्रीराम भक्त मंडळ यांच्या वतीने गेल्या तीन वर्षापासून श्री.गोविंद गिरी देवजी महाराज, किशोरजी व्यास यांच्या कृपाआशिवादाने प्रभू श्री रामचंद्रांच्या श्री रामनवमीनिमित्त राम पहाट या कार्यक्रमाचे आयोजन आज कुसूम सभागृहात आयोजित करण्यात आले होते. राज्यभरातील दिग्गज कलावंतांनी प्रभू श्रीरामचंद्रावरच्या विविध रचना सादर करुन रसिकांना मंत्रमुग्ध केले. राम गितांची मंगलमय सुरमयी प्रभात हा राम गितांचा कार्यक्रम गेल्या तीन वर्षापासून सातत्याने होत आहे. या कार्यक्रमाची संकल्पना निर्मिती, निवेदन प्रख्यात निवेदक ॲड.गजानन पिंपरखेडे यांचे असून, निर्मिती सहाय्य पत्रकार विजय जोशी यांचे आहे. कलांगण प्रतिष्ठाण, श्रीराम भक्त मंडळ यांच्या वतीने गेल्या तीन वर्षापासून हा कार्यक्रम होत आहे. यावर्षी पुणे येथील प्रख्यात गायक संजीव मेहंदळे, प्रख्यात गायिका आरती दिक्षीत, प्रख्यात आसावरी जोशी-ेबोधनकर, सुप्रसिध्द गायिका प्रणोती बिलोलीकर यांनी विविध भक्तीगिते सादर करुन नांदेडकरांना मंत्रमुग्ध केले. संगीत संयोजन छत्रपती संभाजीनगरचे राजेश देहाडे यांचे होते. तर तबला-ढोलक-ढोलकीवर सिध्दोधन कदम, तर अन्य संगीतसाथ बाबा खंडागळे, रोहित बन्सवाल व पवन तेहाले व व्हायोलिनवर पंकज शिरभाते यांनी संगीतसाथ दिली. या कार्यक्रमाचे उद्घाटन वे.शा.स.खंडूगुरु जोशी आसोलेकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रम सुरु होतांना वैदिक मंत्रघोष वे.शा.स.मनोजगुरु पेठवडजकर व याज्ञवल्क्य वेदपाठ शाळेचे विद्यार्थी यांनी केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने रामकथा व श्रीमद भागवत कथेचे निरुपणकार वे.शा.स.विश्वासशास्त्री घोडजकर यांना रामसेवा गौरव पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. उद्घाटन सोहळ्यास शिवप्रसाद राठी, पोटविकार तज्ज्ञ डॉ.नितीन जोशी, डॉ.हंसराज वैद्य, उद्योजक राजेंद्र हुरणे, रमेश मिरजकर, अनिल शेटकार, महावीर सेठींया, पंकज लोखंडे हे मान्यवर देखील उपस्थित होते. दिपप्रज्वलनानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रख्यात गायक संजय मेहंदळे, आरती दिक्षित, आसावरी जोशी, प्रणोती बिलोलीकर, रमेश मेगदे, विजय जोशी यांनी विविध रचना सादर केल्या. त्यात नादातून या नाद निर्मितो, विश्वाचा विश्राम रे, उठी श्रीराम पहाट झाली, ढुमक चलत रामचंद्र, अविरत ओठी यावे नाम, मन राम रंगी रंगले, राम का गुणगाण किजीए, आज अयोध्या सजली, अब उठो सिया सिंगार करो, मेरी झोपडी के भाग जायेंगे राम आऐगे, रामा रामा रटते रटते बितीरे उमरीया अंजनीच्या सूता, बाजे रे मुरलीया, बजाओ ढोल स्वागत मे आदी रचना सादर करुन रसिकांना मंत्रमुग्ध केले. प्रणोती बिलोलीकर हिने गायिलेल्या गितावर रसिकांना ठेका धरला. या गाण्याला वन्समोअर मिळाला. सर्वच कलावंतांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट निवेदन ॲड.गजानन पिंपरखेडे यांनी केले. तर उद्घाटकीय कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रमेश मेगदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवप्रसाद राठी, डॉ.सुरेश दागडीया, ॲड.चिरंजीलाल दागडीया, निलेश चांडक, रमेश सारडा, नंदकुमार दुधेवार, माधवराव पटणे, प्रणव मनूरवार, प्रा.प्रभाकर उदगीरकर, स.जगजीवनसिंघ रिसालदार, डॉ.सुशिल राठी, विजय डुमणे, रमेश सुरकुटवार तसेच स्वामी समर्थ मंदिर व अन्नछत्र सोमेश कॉलनी नांदेड येथील सर्व सहकाऱ्यांनी व महिलांनी परिश्रम घेतले.

### भारतीय बौद्ध महासभा समता सैनिक दल आणि भिमजयंती मंडळ संयुक्त कार्यक्रम

**लोहा**-लोहा तालुक्यातील तसेच नांदेड दक्षिण मतदार संघातील सोनखेड सर्कल अंतर्गत येत असलेल्या, जवळा (दे) या गावांमध्ये विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी चक्रवर्ती राजा सम्राट अशोक जयंती साजरी करण्यात आली. यावेळी भारतीय बौद्ध महासभा नांदेड जिल्हा संरक्षण सचिव तथा आकाशवाणी नांदेड प्रासंगिक निवेदक आयु. आनंद गोडबोले यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रासंगिक निवेदक आनंद पुरभाजी गोडबोले, जेष्ठ आंबेडकरवादी रोहिदास गोडबोले,समता सैनिक दलाचे रविकांत गच्चे, गुणवंत बालाजी गच्चे, उपासक भिमराव चांदु गोडबोले, विलास पांडुरंग गोडबोले ,वसंत नागोराव गोडबोले,पंकज पुरभाजी गोडबोले, उपासक सुरज कैलास गोडबोले, साई भिमराव गोडबोले, मिलिंद बाबुराव गोडबोले, वसंत हिंगोले,धम्मदिप गोडबोले, सुंदरबाई पुरभाजी गोडबोले , विमलबाई गोडबोले, मयुरी गोडबोले, सोनाली गोडबोले, सम्राट गोडबोले , साक्षी गोडबोले, अपेक्षा गोडबोले, शाश्वती गच्चे, कावेरी गच्चे, रितेश गवारे , आकांक्षा गोडबोले, यांच्या सह भारतीय बौद्ध महासभा ग्रामशाखा, विध्यार्थी भिमजयंती मंडळ, विश्वशांती बुद्ध विहार कमिटी, डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, उपासक,उपासिका व बालक बालिका यांची उपस्थिती होती.



**किनवट**-रामनवमीनिमित्त लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांनी ६ एप्रिल रोजी रामनगर येथील मंदिरात जाऊन प्रभू रामचंद्राची विधिवत पूजा केली तसेच आरती करून दर्शन घेतले.या प्रसंगी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी उपनगराध्यक्ष व्यंकट नेम्मानीवार यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व भाविकभक्त उपस्थित होते.

## मुख्यमंत्री फडणवीसांनी घेतली कृष्णाच्या शिक्षणाची जबाबदारी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०६ एप्रिल**

वसमत तालुक्यातील गुंज येथील शेतमजुरांना घेऊन जाणारी ट्रॅक्टर ट्रॉली विहिरीत पडून झालेल्या दुर्घटनेतील मृतांचा मुलगा कृष्णा राऊत याच्या शिक्षणाची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. तर मृताच्या कुटुंबियांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून रविवारी दि.६ गुंज येथे विशेष सहायता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. घटनेतील कुटुंबांच्या पाठीशी शासन उभे राहिले असून आज नांदेड व हिंगोली येथील जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांमार्फत पुन्हा या घटनाक्रमाचा आढावा घेतला.

## पात्रता नसताना घरकुलाचा लाभ घेतल्या प्रकरणी २० जणांविरूध्द गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**कुंडलवाडी, दि.०६ एप्रिल**

कुंडलवाडी पोलीस स्टेशनामधील दोन अधिकाऱ्यांसह इतर अठरा जणावर न्यायालयाच्या आदेशाने वीस जणा विरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली आहे.

कौठा ता.बिलोली येथील संभाजी गंगाराम साखरे, नारायण गंगाधर साखरे, विरभद्र मा.साखरे, सदाशिव गं.साखरे, हनमाबाई विठ्ठल साखरे, चंद्रकांत ना.चेंडे, शंकर भगवंता खरबले, दत्ताहरी ना.चेंडे, यादव अ.गायकवाड, शिवाजी ला.साखरे , राम गंगाराम मेगे, रामराव शंकर साखरे रा.सर्व कौठा हे सर्वजण पंतप्रधान घरकुल योजनेसाठी अपात्र असताना सुध्दा पात्र दाखवून प्रत्येकी एक लाख वीस हजार अनुदान उचलले ह्या प्रकरणी शेख मकसुद शेख अहमद रा.लोहगाव यांनी तक्रार केली होती व लावून धरली होती. न्यायालयाच्या आदेशानुसार हांच्या सह तत्कालीन गट विकास अधिकारी राजकुमार मुक्कावार, प्रकाश नाईक, स. लेखा अधिकारी दिलीप चोंडे, तत्कालीन अभियंता सचिन भद्रे, तत्कालीन सरपंच प्रकाश साखरे, तत्कालीन सरपंच गोदावरीबाई चेंडे, तत्कालीन ग्रामसेवक प्रदीप कोकरे, ग्रामसेवक विठ्ठल वडजे, यांनी आपल्या पदाचा दुरूपयोग करून शासकीय यंत्रणेचा गैर वापर केल्या प्रकरणी यांच्यासह बारा जणावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले असल्याने एकूण वीस जणावर कुंडलवाडी पोलीस स्टेशनमध्ये अपहराचा गुन्हा दाखल करण्यात आले असून पुढील तपास स.पो. नि. ज्ञानेश्वर शिंदे हे करीत आहेत.

## तामसा जि. प. शाळेचे गणवेश वाटपाचे ग्रहण कधी सुटणार ?

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि.०६ एप्रिल**


येथील पीएमसी पुरस्कृत आणि पंचतारांकित असलेल्या जिल्हा परिषद हायस्कूल शाळेला एका पंधरवाड्यापूर्वी शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या शालेय गणवेश वाटपाला आजूनही मुहूर्त सापडला नसल्याने पालक व विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून गणवेश वाटपाला लागलेले ग्रहण कधी सुटणार ? असा प्रश्न पालकातून विचारल्या जात आहे. तर गुरुजी, आम्हाला गणवेश कधी मिळणार हो? असे चिमुकले विचारतांना दिसतात.

सन २०२४ - २५ शैक्षणिक वर्षात शालेय शिक्षण विभागाला शालेय गणवेश वाटपाला अगोदरच ग्रहण लागले होते. तामसा येथील पीएमश्री पुरस्कृत जिल्हा परिषद हायस्कूल प्रशाळेला मराठी माध्यमाच्या ७३६ व उर्दू माध्यमाच्या ४०३ विद्यार्थ्यांसाठी १ हजार १३९ गणवेश मागील पंधरवाड्यापूर्वीच प्राप्त झाले. मुख्याध्यापक देविदास अक्कमवाड यांनी गणवेश वाटपाची कार्यवाही सुरू केली होती. शाळेतील उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटपही केले. परंतु मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या गणवेश वाटपात कापडाचा दर्जा, शिलाई, रंग यावरून विनाकारण आक्षेप घेत अडचणी निर्माण केल्याचे सांगण्यात येते. गणवेश वाटप न करण्याचे खरे कारण गुलदस्त्यात असले तरी गणवेश शाळेमध्ये 'थेट' उपलब्ध होणे, हेच खरे कारण असल्याचे मानले जाते. नव्हे तर या प्रकारामागील खरे कारण म्हणजे 'अर्थकारण' असल्याची शहरात जोरात चर्चा आहे. एकीकडे गणवेश वाटपाला पालकांचा विरोध असल्याचे दर्शविले जातो. तर दुसरीकडे अनेक पालकांनी मुख्याध्यापकांना गणवेश वाटप का करीत नाहीत? अशी विचारणा होत असल्याने मुख्याध्यापकाची गोची झाली आहे. यातून मार्ग काढण्यासाठी मुख्याध्यापकांनी वरिष्ठांचे मार्गदर्शन मागितल्याने हे प्रकरण शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी कार्यालयापर्यंत पोहोचले आहे. वरिष्ठांचे मार्गदर्शन येईपर्यंत दुसरेही शैक्षणिक सत्र संपू शकते. तेंव्हा प्रशालेचे मुख्याध्यापक शासकीय कर्तव्यानुसार कार्यवाही करतात की, दबावाला बळी पडून गणवेश वाटपातील संभ्रम कायम ठेवतात, हे पाहणे औच्छुक्याचे झाले आहे.

## भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त हदगावात कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.०६ एप्रिल**

भारतीय जनता पार्टी हदगाव मंडळ च्या वतीने भारतीय जनता पार्टी स्थापना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असुन कार्यक्रमाची सुरवात प्रभु रामचंद्रांच्या प्रतीमेच पुजन करुन सुरवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे आकर्षण ठरले ते म्हणजे मोठ्या स्क्रीनवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी ऑनलाइन द्वारे पदाधिकारी यांना संबोधित केले तसेच महाराष्ट्रात दीड कोटी प्राथमिक सदस्य नोंदणी केल्याबद्दल पदाधिकाऱ्यांना



यावेळेस शुभेच्छा देण्यात आले.

सदरील कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती तालुकाध्यक्ष तातेराव पा वाकोडे आनंदराव भंडारे, सुरेश सारडा, शिरीष मनाठकर यांच्या उपस्थितीत पार पडला.यावेळी जेष्ठ पदाधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी भाजपा ता सरचिटणीस उमाकांत भोरे, माजी नगरसेवक प्रतिनिधी उमाकांत माळोदे,बाळा पाटील,शहराध्यक्ष मारोती सुर्यवंशी, नगरसेवक सचिन सुर्यवंशी,ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष विजय डुरके, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रुपादेवी पाटील,संजय पांडे,युवा मोर्चा शहराध्यक्ष आकाश जाधव,बाळु शंकुरवार, गजानन लकडे,रसुल कुरेशी,सलीम पटेल,बाळु वंजारे,निलेश कदम, उमाकांत पांडे,बाळु हनवते,आशितोष भुसारे, संदीप आढाव, सचिन सावंत,साई सुर्यवंशी,गोलु पारटकर,प्रशांत सावंत, एकनाथ जाधव, अमोल कदम,संजय कदम, गजानन लकडे, गोविंद कळसे,प्रसाद डोके,विष्णु पवार, अमोल जगताप, प्रदीप चिंचोलकर, अशोक देशमुख,विध्याधर देशमुख, संतोष कांबळे,लखन तलवारे, कल्पना देशमुख, ज्योती शिगंणकर,कार्तिक सेंद्री,अनुसया देशमाने, गंगासागर ताई व तसेच भारतीय जनता पार्टी हदगाव मंडळातील आजी माजी पदाधिकारी व बुथ प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक बाळा पाटील यांनी केले तर मनोगत आनंद भंडारे, उमाकांत दादा, विद्याधर देशमुख, डोरले व आभार सचिन सूर्यवंशी यांनी मांडले.

## मुक्रमाबाद येथे भव्य यात्रा व अखंड शिवनाम सप्ताह प्रारंभ

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि.०६ एप्रिल**

तालुक्यातील मुक्रमाबाद येथील चालुक्य कालीन हेमाडपंथी महादेव मंदिरात प्रति वर्षाप्रमाणे यंदाही भव्य यात्रा, अखंड शिवनाम सप्ताह ,व ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळा संपन्न होणार आहे.

सप्ताह प्रारंभ चैत्र शुद्ध १० रोज सोमवार दि.०७ ते सांगता चैत्र कृष्णपक्ष १ दि.१४ रोज सोमवार या शुभ दिनी सद्गुरू राष्ट्रसंत ष.ब्र.डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज (राजुरा मठ) यांच्या कृपा आशीर्वादाने अखंड शिवनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे तरी सर्व भावी भक्तांनी या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा व आपले जीवन कृतार्थ करून घ्यावे ही विनंती.

श्री ची रथातून भव्य मिरवणूक व भस्म उधळण चैत्र शुद्ध १५ दि. १२ शनिवारी पहाटे ५ वाजता संपन्न होणार आहे. महाप्रसाद दि.१४ रोज सोमवार. महादेव मंदिर श्री ची पालखीतुन मिरवणुक दि. १५ रोज मंगळवार सकाळी ६ वाजता.

दि.११ रोज शुक्रवार शि.भ.प.ष.ब्र.१०८ सद्गुरू संगनबसव शिवाचार्य महाराज निलंगेकर दि.१२ रोज शनिवार शि.भ.प.श्री मोहनराव कावडे महाराज हासनाळीकर दि.१३ रोज रविवार टाळ आरती चे कीर्तन शि.भ.प.श्री काशिनाथ महाराज सुंदाळे रात्री चे कीर्तन शि.भ.प श्री शिवानंद महाराज हैबतपुरे व सप्ताहाच्या समाप्ती च्या महाप्रसादाचे किर्तन दि.१४ रोज सोमवारी ठीक सकाळी १० वाजता शि.भ.प.ष.ब्र.श्री सद्गुरु वेदांताचार्य दिगांबर शिवाचार्य महाराज वसमतकर, तरी परिसरातील व गावातील सर्व भक्तांनी या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा अशी विनंती श्री महादेव मंदिर खडकेश्वर व समस्त गावकरी यांनी केले आहे.

## नांदेडचे बसस्थानक १२ एप्रिल पासून कौठा मैदानावर स्थलांतरीत होणार

### नागरिकांनी, ऑटोचालकांनी नोंद घेण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०६ एप्रिल**

नांदेडच्या बस स्थानकाला रेल्वे स्टेशन पासून जोडणारा मुख्य रस्ता दुरुस्त करण्यासाठी मर्यादित कालावधी करिता नांदेड बस स्टॅन्ड बंद करण्यात येत आहे. ते कौठा मैदानावर स्थानांतरीत करण्यात येत आहे,याची नागरिकांनी नोंद घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

या नव्या निर्णयानुसार १२ एप्रिल पासून जुने बसस्थानक रस्त्यासाठी बंद करण्यात येणार आहे. नागरिकांनी या निर्णयासाठी सहकार्य करावे व संबंधित यंत्रणेने ठरलेल्या वेळेच्या आधी रस्त्याचे काम पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

रेल्वेस्थानक ते मध्यवर्ती बसस्थानक हा रस्ता अत्यंत खराब झाला आहे. बराच काळाचा निर्णय प्रलंबित होता. तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भात दोन वेळा बैठका घेतल्या होत्या. १२ मार्च रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बसस्थानकाला प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर तातडीने हा निर्णय घेण्यात आलेला आहे.

यामुळे प्रवाशांना काही प्रमाणात असुविधा होऊ शकते. ऑटो चालकांनी या काळात प्रवाशांना मदत करावी. तसेच ऑटो चालक व अन्य प्रवासी वाहतुकीला आवश्यक पूरक व्यवस्था कौठा मैदान येथे निर्माण करण्यात येत आहे. विशिष्ट कालमर्यादेत हे काम पूर्ण व्हावे, यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही लक्ष देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मुख्य बसस्थानक येथील रस्त्यांच्या दुरूस्तीच्यावेळी ड्रेनेजलाईन, पाईपलाईन, फायबर केबल यासंदर्भातील सर्व अडथळे तातडीने दुरूस्त करण्याबाबत बैठकीमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. याशिवाय नव्या बसस्थानकाची तात्पुरती व्यवस्था होताना प्रवाशांची सुरक्षितता, तात्पुरते शौचालय, स्वच्छता गृहे व अन्य अनुषंगिक व्यवस्था तसेच वाहतुकीमध्ये होणाऱ्या बदलामुळे कि.मी. अंतरातील नवे टप्पे निश्चित करण्याचे काम सर्व संबंधित विभागाने वेळेच्या आत करावे, अशी सूचना त्यांनी दिली आहे. यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी, नांदेड तहसिलदार, आगार व्यवस्थापक, पोलीस वाहतुक शाखा, प्रादेशिक परिवहन विभाग व महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी आढावा घेऊन विक्रमी वेळेत हा रस्ता पूर्ण करावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

## बारड शिवारात रानडुकराच्या हल्ल्यात शेतमजूर गंभीर जखमी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.०६ एप्रिल**

तालुक्यातील बारड येथे शेतात काम करत असलेल्या संदीप आठवले (३५) या शेत मजुरावर रानडुकराने अचानक हल्ला केला. यात आठवले गंभीर जखमी झाले असून त्याच्यावर बारड येथील ग्रामीण रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या परिसरात वानर, माकडे, रानडुक्कर, बिबटे आणि रोहींचा हौदोस माजाला असल्याने वन विभाग कोमात आणि जंगली प्राणी जोमात असल्याची चर्चा आहे.

संदीप गोविंदराव आठवले शेतातील ज्वारी पिकाला दि.५ एप्रिल रोजी पाणी देत असताना रान डुक्कराने मागून हल्ला केला. यात आठवले यांच्या पायाचा लचका तोडून हल्ला केला. या घटनेनंतर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी भेट देऊन पंचनामा केला. तसेच जखमींना शासनाच्या नियमानुसार मदत देण्यात येईल असे कर्मचाऱ्याने सांगितले आहे.



बारड परिसरात मागच्या अनेक वर्षांपासून वानरे, माकडे, रान डुक्करे, रोही यांचा खुलेआम वावर असून माकडाच्या हल्ल्यात मध्यंतरी गावात एक बालकही मृत्युमुखी पडला होता. सध्या वानराचा आणि माकडांचा धुमाकूळ असल्यामुळे गावात माकड'राज' निर्माण झाले आहे. पूर्वी ग्रामपंचायत द्वारे वानरांचा बंदोबस्त करण्यासाठी गावात बंदूकदारी कर्मचारी असायचा, मागच्या दहा वर्षात बंदूकदारी कर्मचारी बेदखल झाल्याने गावात आता माकड'राज' निर्माण झाले आहे. त्यामुळे सध्या वनविभागाचे वन्य प्राण्यांच्या बंदोबस्ताकडे अक्षम्य दुर्लक्ष असल्यामुळे परिसरात वन्य प्राण्यांचा धुमाकूळ माजला आहे.

## राष्ट्रनिष्ठा आणि सर्वांगीण विकासात्मक ध्येयधोरणामुळे भाजपा जगात अव्वलस्थानी: आ. भीमराव केराम

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.०६ एप्रिल**

भारतीय जनता पक्षाचा वर्धापन दिन किनवट शहरात ठीकठिकाणी वेगवेगळ्या उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला असून यावेळी किनवट माहूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते लोकार्पण जनसंपर्क कार्यालयात पक्षाच्या ध्वजाचे ध्वजारोहण करून मानवंदना देण्यात आली.राष्ट्रनिष्ठा आणि सर्वांगीण विकासाच्या ध्येयधोरणामुळे भारतीय जनता पक्षाने जगात अव्वलस्थान प्राप्त केले असे मौलिक प्रतिपादन आ. भीमराव केराम यांनी या प्रसंगी बोलताना केले आहे.

६ एप्रिल हा भारतीय जनता पक्षाचा वर्धापन दिन असून यानिमित्त भारतीय जनता पक्ष किनवट तालुक्याच्या वतीने शहरात विविध उपक्रम राबविण्यात आले. सकाळी ९ वा. भारतीय जनता पक्षाच्या लोकार्पण जनसंपर्क कार्यालयात आमदार भीमराव केराम यांच्या शुभहस्ते पक्षाच्या ध्वजाचे



ध्वजारोहण करून मानवंदना देण्यात आली. यावेळी वंदे मातरम व भारतीय जनता पक्षाचा विजय असो..! अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर रामनवमी निमित्त राममंदिर येथे आयोजित केलेल्या मोटरसायकल रॅलीला आमदार भीमराव केराम यांनी हिरवी झेंडी दाखविली तर गोकुंदा येथील स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे चौकात आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन आ. केराम यांच्या हस्ते करण्यात आले.

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने देशाचा कायापालट केला. सबका साथ सबका विकास या सर्वसमावेशक धोरणामुळे भारतीय जनता पक्ष हा भारतातच नव्हे तर जगामध्ये पहिल्या क्रमांकाचा राजकीय पक्ष ठरला आहे. राष्ट्रनिष्ठा समर्पण आणि त्याग हे पक्षाचे प्रमुख अंग असून याच तत्वावर भारत देशाची वाटचाल जागतिक महासत्ता आणि अखंड हिंदुस्तानाकडे सुरू आहे असे मौलिक प्रतिपादन आमदार भीमराव केराम यांनी याप्रसंगी बोलताना केले.

वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे सर्व आघाड्याचे प्रमुख पदाधिकारी, महिला आघाडी, शक्ती केंद्रप्रमुख, बुथप्रमुख तसेच कार्यकर्ते हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यात ठिकठिकाणी भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिवस साजरा

## हिंगोलीत भाजप जिल्हा कार्यालयात केले ध्वजारोहन





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ एप्रिल**

जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाच्यावतीने ४५ वा स्थापना दिन साजरा करण्यात आला. हिंगोली येथील भाजपच्या जिल्हा कार्यालयात सकाळी ९ वाजता भाजपचेच आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते ध्वजारोहन करीत स्थापना दिन साजरा करण्यात आला. तसेच श्रीराम जन्मोत्सवानिमित्त श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

येथील भाजपच्या जिल्हा कार्यालयात स्थापना दिनानिमित्त ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी आ. गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, प्रा दुर्गादास साकळे, ॲड के के शिंदे, उपाध्यक्ष संतोष टेकाळे, सरचिटणीस उमेश नागरे, सदाशिव सुर्यतळ, माजी शहराध्यक्ष क्रिष्णा रूहीटीया, शाम खंडेलवाल, संजय ढोके, हमीद प्यारेवाले, आशिष जैस्वाल, उमेश गुठ्ठे, बाबा घुगे, संजय खंडेलवाल, मनोज शर्मा यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. यावेळी आ, मुटकुळे यांनी भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना शुभेच्छा देत पक्षसंघटन मजबुत करण्यासाठी मार्गदर्शन केले.

औंढा नागनाथ शहरातील भारतीय जनता पार्टी पक्षाचा स्थापना दिवस सहा एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजता उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील चिंतामणी मंदिराजवळील बाजार मैदानात कमळाची रांगोळी आणि पक्षाचा ध्वज उभारून कार्यकर्त्यांनी भाजपाचा ४५ वा स्थापना दिवस रवीवारी उत्साहात साजरा केला.भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरजितसिंह ठाकूर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य पांडुरंग पाटील, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरजितसिंह ठाकूर, प्रदेश कार्यकारणी सदस्य अँड गणेश ठाकूर, नगरसेविका अश्विनी पाटील, तालुकाध्यक्ष सखाराम इंगळे, शहर अध्यक्ष बबन सोनुन, गणेश पाटील, नवनाथ देशमुख, महेश जोशी, गणेश देशमुख, अभिजीत लोखंडे, राजू गिरी, केतन झांजरी, प्रशांत स्वामी, डीगांबर सोनुन, मंगेश गुरव, गजानन पाठक, प्रल्हाद देशमुख, गोविंद पाठक, बसवेश्वर स्वामी यांच्यासह भारतीय जनता पार्टी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# जिजाऊ रथयात्रेचे हिंगोलीत जल्लोषात स्वागत, भव्य मिरवणुक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ एप्रिल**

मराठा सेव संघ संचलित मराठा जोडो अभियानांतर्गत जिजाऊ रथ यात्रेचे हिंगोली शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. यात्रेमध्ये सर्व धर्मिय नागरिक, माजी सैनिक, महिलांचा मोठा सहभाग होते. शिवशंभो ढोलपथक मिरवणुकीत सहभागी होते. ठिकठिकाणी आतिषबाजी व महात्मा गांधी चौकात शाहिरी जलसा व प्रबोधन सभा संपन्न झाली.

मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड व सर्व कक्षाच्या वतीने हिंगोली शहरात जिजाऊ रथ यात्रेचे अग्रसेन चौकात स्वागत करण्यात आले. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात यात्रेचे आगमन झाल्यानंतर अतिषबाजी करण्यात आली. जल्लोषात स्वागत करत छत्रपती शिवरायांच्या पुतळयास अभिवादन करण्यात आले. जिजाऊ रथातील राजमात जिजाऊ यांच्या पुतळयाचे पुजन व पुष्पहार अर्पण करुन मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. शिवशंभो ढोलपथकाचा गजर, बॅन्ड पथक, माजी सैनिक व सर्व धर्मिय नागरिकांचा सहभाग मिरवणुकीमध्ये होता. शेकडो महिला मिरवणुकीत सहभागी होत्या. महात्मा गांधी चौकात शाहिरी जलसा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यानंतर विचारपिठावर सभा संपन्न झाली. या सभेच्या अध्यक्षस्थानी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव ढोकर पाटील हे होते. प्रमुख पाहुणे म्हणुन जिजाऊ रथ यात्रा संकल्प प्रा.अर्जुनराव तणपुरे, रथयात्रा प्रमुख सौरभ दादा खेडेकर, संदिपपान जाधव, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड मनोज आखरे, डॉ. गजानन पारथी(अकोला), उमाकांत उफाडे(लातुर), सतिष जाधव, साधनाताई हेंबाडे, खंडेराव सरनाईक, ज्योतीताई कोथळकर, सुनिताताई मुळे, शितलताई कल्याणकर, पोनि नरेंद्र पडाळकर, माजी सैनिक मिर आली यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक मराठा सेवा संघाचे कार्याध्यक्ष पंडित अवचार यांनी केले. या सभेत कविंद्र परमानद कृत श्री शिवभारत पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. उपस्थित मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. सामाजिक एकता व सद्भाव निर्माण करत दलमुक्त महाराष्ट्र असा उदात हेतु जिजाऊ रथयात्रेच्या माध्यमातुन पोहचविण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन मान्यवरांनी केले. या रथयात्रेच्या मिरवणुक व सभेला मोठा जनसमुदाय उपस्थित होता. उपस्थितांचे आभार मराठा सेवा संघाचे सचिव राजकुमार वायचाळ यांनी मानले.

# श्रीराम जन्मोत्सवानिमित्त श्रीराम, साई माऊलींची पालखी





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ एप्रिल**

शहरातील मुख्य आकर्षण असणाऱ्या रिसाला बाजार येथील श्री साई माऊलींची पालखी असते. दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी साईमाऊलीतर्फे श्रीराम जन्मोत्सवानिमित्त शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य पालखी काढण्यात आली. या पालखी सोहळ्यात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला.

येथील रिसाला बाजार भागातील साई मित्रमंडळाकडून श्रीराम जन्मोत्सवानिमित्त दुपारी चार वाजता भव्य पालखी सोहळा काढण्यात आला. या पालखी सोहळ्यात श्रीराम यांची आयोध्या येथील श्रीराम लल्लाची भव्य मूर्तीची पूजा करून भव्य रथावर स्थापन करून शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य मिरवणुक काढण्यात आली. या पालखी सोहळ्यात श्री साई यांची पालखीचे दर्शन घेण्यासाठी रस्त्यावर भाविक गर्दी करतात. पारंपारीक वेशभूषेत पालखीतील लोक सहभागी होतात. भजनी मंडळ, बँड पथके, सजवलेले रथात लहान मुलांचे देखावे यांचा समावेश असल्याने पालखी सोहळा आकर्षण बनला आहे. या मिरवणुकीत सहभागी झालेल्या नागरिकांनी दरवर्षी येथील व्यापारी जगजीतराज खुराणा यांचे कुटुंबियांकडून थंड पेयाची व्यवस्था देखील केली जाते.



**हिंगोली– शहरासह जिल्ह्यात श्रीराम नवमीनिमित्त चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी शहरातील विविध भागात भेटी देत तेथील पोलिस बंदोबस्ताचा आढावा घेत नागरिकांना शांततेत श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले.**

# जिल्ह्यात ठिकठिकाणी श्रीरामजन्मोत्सव उत्साहात साजरा, मिरवणुका, महाआरतीचे आयोजन











**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ एप्रिल**

शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शहरातून श्रीराम यांच्या प्रतिमेची भव्य शोभा यात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत चिमुकल्यांनी श्रीराम, लक्ष्मण, सीता तसेच हनुमानाची वेशभूषा साकारली होती. शहरातील मंदिरांमध्ये श्रीराम जन्मानिमित्त दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

शहरातील राम गल्ली भागातील श्रीराम मंदिरात सकाळी श्रीरामाला अभिषेक करण्यात आला. त्यानंतर महाआरतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी किर्तनाचे आयोजन करण्यात करण्यात आले होते. मोठ्या संख्येने महिला, पुरूष तसेच तरूण-तरूणी यांची उपस्थिती होती. शहरातील मुख्य चौकांमध्ये श्रीरामांचे भव्य असे बॅनर नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते तर शहरातील मुख्य रस्त्यावर भगवे झेंडे आणि पताका लावण्यात आल्या होत्या.

येथील गंगा नगर भागातील राणीसती मंदिरात माँ कनकेश्वरी देवी यांच्याहस्ते श्रीरामाची आरती करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. श्रीराम जन्मानंतर याठिकाणी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी रामचंद्र कयाल, विठ्ठल सोळंके यांच्यासह योग समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले. शहरातील प्राचीन खाकीबाबा मठातही श्रीराम जन्मोत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. यावेळी महंत कौशल्यादास महाराज यांचेहस्ते श्रीरामाची महाआरती करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने परिसरातील भाविक उपस्थित होते. शहरातून श्रीरामाची भव्य मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणुकीत महिला पुरूष तसेच रामभक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत शहरातील प्रमुख मार्गावरून ही मिरवणुक काढली. यावेळी दिपक निमोदीया, बगडीया आदी कार्यकर्त्यानी परिश्रम घेतले. चिमुकल्यांनी श्रीराम, लक्ष्मण, सीता आणि हनुमानाच्या वेशभूषा साकारल्या होत्या. यावेळी जय श्रीरामच्या गर्जनेने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

शहरातील शिवाजी नगर भागातील श्री दत्त मंदिरात श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी हभप नंदकुमार विडोळकर यांचे किर्तनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

औंढा नागनाथ शहरातील श्री राम मंदिरामध्ये श्री राम नवमीनिमित्त श्रीराम जन्मोत्सव कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. यावेळी श्री रामकथेचे वाचन नीळकंठ देव यांनी केले. बारा वाजता श्री राम जन्म झाल्यानंतर फटाक्याची आतषबाजी करून व ढोल वाजवून श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राम मंदिरात महाआरती झाली. यावेळी एस पी कनकुटे, अनिल देव, शहरातील प्रतिष्ठित नागरिक यांच्यासह रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलिस निरीक्षक जी एस राहिरे, पोलिस उपनिरीक्षक अमोल इंगोले, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक पंजाबराव थिटे, सहायक पोलिस उपनिरीक्षक अफसर पठाण, संदीप टाक, माधव सूर्यवंशी, अमोल चव्हाण, गजानन गिरी, ज्ञानेश्वर गोरे, रावसाहेब देशमुख यांच्यासह पोलिस कर्मचारी व होमगार्ड एस आर पी एफ प्लाटून यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.

# शिरड शहापूरमध्ये भाजपचा स्थापना दिन

**तभा वृत्तसेवा**
**शिरडशहापूर, ६ एप्रिल**

भारतीय जनता पक्ष स्थापना दिवस मिलिंद यंबल यांच्या मार्गदर्शनात भाजपा कार्यालय शिरड शहापूर येथे भारतीय जनता पार्टी स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पक्षाच्या ध्वजाचे ध्वजारोहन मिलींद यंबल यांचेहस्ते करण्यात आले. यंबल यांनी भाजपच्या स्थापना दिनाबाबत यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी महिला तालुकाध्यक्ष भाजपा अरुणाताई बीच्चेवार सरपंच जितुभाऊ रावले, उपसरपंच शिवहार स्वामी, माजी उपसरपंच संभाजी जोगदंड पैलवान, विजय कटारे, गजानन रावले, केतन मुकीरवार, शिवराज कोंडे, शिवप्रसाद बिच्चवार, जयराम सूर्यतळ, तुषार लांडगे, रामा बिच्चवार, बालाजी कोरडे, पंडित जोगदंड, गणेश रावले, वसंत चिलकेवार, गजानन रावले, गजानन स्वामी,बाळू आप्पा नांदेडकर, दसवंते मानकरी, अशोक देशमुख, पिंटू आबा सत्तेपाल गजानन,देशमुख, नवनाथ कोरडे, रामा जोगदंड, बालाजी जोगदंड, कैलास रावले, निखिल लुटे, निलेश दीक्षे, विठ्ठल आकमार, रवी बोराळकर, गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहोली खुर्द जिल्हा परिषद शाळेत चावडी वाचन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ एप्रिल**

तालुक्यातील राहोली खुर्द शाळेत चावडी वाचन व गणन कार्यक्रम निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत आयोजित करण्यात आला होता.यामध्ये इयत्ता पहिली ते इयत्ता सातवी वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यांना वाचता लिहिता यावे यासाठी निपुण महाराष्ट्र अभियान राज्य शासनाने सुरू केले आहे.त्याप्रमाणे ज्या विद्यार्थ्यांना वाचन करता येते आणि ज्यांना वाचता येते नव्हते त्यांचे वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी विविध कृती आराखडे तयार करून प्रत्येक विद्यार्थ्यांना वाचन करता आले पाहिजे यासाठी शिक्षकांनी विविध अध्यापन पद्धती वापरून शंभर टक्के विद्यार्थ्यानी वाचन कौशल्य आत्मसात केले आहे अशा सर्व विद्यार्थ्याचे वाचन गावातील नागरिक, पालक, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष आणि सदस्य यांना निमंत्रित करून त्यांच्या पुढे विद्यार्थ्यांचं प्रत्यक्ष वाचन घेण्यात आले.यावेळी सवड केंद्राचे केंद्रप्रमुख रघुनाथ काळे, मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. अध्यक्ष स्थानी शाळेचे मुख्याध्यापक गजानन बोरकर उपस्थित होते प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रमेश गरड, प्रकाश घरबुडवे, बालाजी गरड, शामराव फुंडसे उपस्थित होते. आपल्या पालका समोर आणि गावकऱ्या समोर मोठ्या उत्साहाने पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी वाचन केले. यावेळी निपुण महाराष्ट्र अभियान याबद्दल केंद्रप्रमुख काळे साहेबांनी सर्व विद्यार्थांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक गजानन बोरकर यांनी केला. चावडी वाचन कार्यक्रमात सर्व विद्यार्थिनी सहभाग घेतला या कार्यक्रमाचे संचलन सौ सिंधूताई दहिफळे यांनी केले प्रास्ताविक अभिनंदन घोंगडे यांनी केले.यावेळी शिक्षक सुधाकर जाधव, सौ. नर्सिकर, सौ.इंगोले, सौ.राठोड यांच्यासह बहुसंख्य गावकरी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# बाजार समितीसमोर रविवारीच हळदीची वाहनांच्या रांगा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ एप्रिल**

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संत नामदेव मार्केट यार्डसमोर रविवार दुपारपासूनच हळद विक्रीसाठी आणलेल्या वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. मागील आठवड्यापासून येथील बाजार समितीमध्ये हळदीला १० हजार ते १४ हजार प्रतिक्विंटल भाव मिळत असल्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी बाजार समितीमध्ये हळद विक्रीसाठी आणत आहे. परंतु लांबच लांब रांगा लागत असल्याने उशिरा येणाऱ्या शेतकऱ्यांना दोन दिवस मुक्काम करावा लागत आहे. त्यामुळे लवकर आपला नंबर लागावा तसेच लवकर बिट व्हावे यासाठी रविवारीच अनेक शेतकऱ्यांनी वाहनाद्वारे हळद विक्रीसाठी आणली होती.